## उष्णतेच्या लाटेमुळे नागपुरातल्या शाळा सकाळच्या सत्रातच

**नागपूर, दि. २८ प्रतिनिधी**
नागपूर जिल्ह्यातील सर्व शाळा सकाळी ७ ते ११.३० या वेळेस सुरु ठेवण्याबाबतचे निर्देश जिल्ह्याच्या शिक्षण विभागाने दिले आहेत. उष्णतेच्या लाटेचा विद्यार्थ्यांना फटका बसू नये या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातील उष्णतेच्या लाटेच्या पार्श्वभूमीवर शाळांनी कोणती दक्षता घ्यावी याच्या सूचना राज्याच्या शिक्षण विभागाने दिल्या होत्या. त्या सूचनांच्या अनुषंगाने जिल्ह्याच्या शिक्षण विभागाने नागपूर जिल्ह्यातील शाळा या सकाळी ७ ते ११.३० या वेळेत घेण्याचा निर्णय जाहीर केला आहे. प्राथमिक आणि माध्यमिक अशा दोन्ही विभागातील शाळा सकाळच्या सत्रात घ्याव्या असेही आदेश देण्यात आले आहेत. पालकांच्या भेटी तसेच इतर कामासाठी शिक्षकांना दुपारी १२.३० पर्यंत शाळेत थांबण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.


मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ७७३५

पालघर कार्यालय
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५

नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक | शनिवार, २९ मार्च २०२५ | वर्ष: ६ | अंक:१०० | पाने-८ | किमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकुण रू.३


अग्राग्रलेख
**खरीखरी**

## माणिकरावांची माया

विधिमंडळाचे अधिवेशन संपलेच आहे. त्या अधिवेशनात काय झाले. यापेक्षा काय झाले नाही, याची चर्चा अधिक झाली. सर्वात महत्त्वाचा मुद्दा होता. तो म्हणजे महागाई आणि शेतकऱ्यांचा. विशेषतः शेतकऱ्यांच्या पिकांना वाजवी भाव मिळत नाही. अशी ओरड अनेक बाजूंनी होत होती. कापूस काय, सोयाबीन काय आणि आता तूर काय या सर्वांमध्ये सरकारने घोषित केलेले समर्थन मूल्य मिळत नव्हते. तिकडे विमा कंपन्या नुकसान भरपाईचे दावे स्वीकारण्याएवजी मूग गिळून गप्प बसणे हेच कार्य करीत होत्या. शेतकऱ्यांच्या समोर केवळ हाच एक प्रश्न नव्हता. तर शेतमजुरांची टंचाई आणि त्यामुळे मजुरीच्या दरामधील महागाई शेतकऱ्यांना जिवंतपणे मारून टाकण्यास सज्ज झालेली होती. अशा चारी बाजूंनी असलेल्या भयाण परिस्थितीत जणू रूक्ष वाळवंटात एखादा पाण्याचा झरा दिसावा. त्याप्रमाणे कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी शेतकऱ्यांसाठी दोन महत्त्वाच्या घोषणा केल्या. या घोषणांमुळे शेतकऱ्यांच्या पदरी फुल ना फुलाची पाकळी तरी पडणार आहे. या कृषी क्षेत्रातील विमा कंपन्या कोट्यवधी रुपयांचा नफा कमवीत आहेत. अशा परिस्थितीमध्ये या घोषणा म्हणजे शेतकऱ्यांसाठी थोडासा तरी दिलासा आहेत. शेतकऱ्यांच्या विम्याच्या नुकसान भरपाई पोटी 2555 कोटी शासन विमा नुकसान भरपाई देणार आहे. त्यासाठी मंजुरीही देण्यात आलेली आहे. सरकारने एकूण परिस्थितीचा आढावा घेऊन विमा कंपन्यांना वरील रक्कम तत्काळ देण्याची सूचना केलेली आहे. ही सूचना आहे की आदेश आहे. ते आम्हाला ठाऊक नाही. सूचना असेल तर ती या कानाने एकून त्या कानाने सोडून देता येते आणि जर हा आदेश असेल. तर दोन्ही कानांनी एकून कानोकानी विचार न करता विमा कंपन्यांना ही रक्कम नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना द्यावीच लागेल. अनेक विमा कंपन्यांपैकी काही कंपन्या भारतीय नाहीत. या कंपन्या सरकारी सूचना कशा अवाजवी आहेत. त्यासाठी वातावरण निर्मिती करू शकतात. शेतकऱ्यांचे जे अतोनात नुकसान झाले आहे. ते उघड्या टक्क डोळ्यांनी दिसत असतानाही या विमा कंपन्या वेड पांघरून पेडगावला जाण्याचे नाटक करीतच असतात. ज्या ज्या कृषी विमा कंपन्या सरकारी सूचना व आदेशांचे पालन करीत नाहीत. त्यांना केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर देशातील कोणत्याही राज्यात शेतकऱ्यांचा विमा काढण्याची परवानगीच देऊ नये. हाच एकमात्र यावरील उपाय ठरू शकतो. कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी दुसरी घोषणा शेतकऱ्यांच्या वीज बिलाबाबत केलेली आहे. या घोषणेप्रमाणे शेतकऱ्यांना 2029 पर्यंत मोफत वीज मिळणे अपेक्षित आहे. त्यासाठी ही निधीची तरतूद करून मंजुरी देण्यात आलेली आहे. खरंतर घोषणा करण्यात आल्याप्रमाणे ही योजना पाच वर्षासाठी पूर्वीही होती व आहे. अजून त्याचे वर्षी पूर्ण झालेले नाही आणि कृषी मंत्र्यांना योजना चालू ठेवण्याची घोषणा पुन्हा जाहिरपणे करावी लागते. ही खरोखरच आश्चर्याची बाब आहे. त्यातच या विजेचीही मोठी गंमतच आहे. अनेक भागात ही वीज रात्री देण्यात येते. त्यामुळे शेतकऱ्यांना अशीही झोप लागत नाही आणि तशीही झोप घेता येत नाही. अशा या विजेच्या अवेळी पुरवठ्याबाबत लाखो शेतकऱ्यांनी हजारो निवेदने दिलेली आहेत. त्यामुळे सरकारने मोफत वीज योजना चालू ठेवताना वीज पुरवठा निदान सूर्यप्रकाशाच्या साक्षीने मिळेल. याची तजवीज केली, तर सोन्याहून पिवळे होईल. बळीराजा यापुढे तरी अव्यवस्थेला बळी पडणार नाही. हे पाहण्याचे काम सरकारला आता करावेच लागेल. 'ज्या ज्या ठिकाणी काही कमी, तिथे उभे आहोत आम्ही' म्हणजे सरकार आपल्यासाठी उभे आहे. हे शेतकऱ्यांना दिसले पाहिजे. आपल्या राज्यापेक्षा इतर अनेक राज्यात शेतकऱ्यांसाठी कितीतरी सवलती सुरू आहेत. त्याचे अनुकरण थोड्याफार प्रमाणात केले. तरी हे दुःखी शेतकरी एखादी सुखाची झुळूक अनुभवू शकतात. शेतकऱ्यांच्या हितासाठी कृषिमंत्री कोकाटे यांनी सध्यातरी शेतकऱ्यांच्या मार्गावरील काटे दूर करण्याचे काम केलेच आहे. त्यातून कृषिमंत्री शेतकऱ्यांच्या हितासाठी कटिबद्ध आहेत. हे ही दिसून येत आहे. हीच खरी समाधानाची बाब आहे.


nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023


# म्यानमार भूकंपाने हादरले

**तीव्रता ७.७ रिश्टर स्केल**



## बँकॉक, मेघालयापर्यंत जाणवले तीव्र धक्के

**नायपीडाव/बँकॉक, दि. २८ वृत्तसंस्था**
म्यानमारला शुक्रवारी जोरदार भूकंपाचे दोन तीव्र धक्के बसले. या भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर ७.७ आणि ६.४ अशी नोंद झाली. या भूकंपाचे हादरे इतके तीव्र होते की ९०० किलोमीटर दूर असलेल्या थायलंडच्या बँकॉकमध्येही याचे धक्के जाणवले. लोक घाबरून घराबाहेर पडले, तसेच काही इमारतींचे मोठे नुकसान झाले आहे. राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राच्या माहितीनुसार, या भूकंपाचा केंद्रबिंदू भूगर्भात १० किलोमीटर खोलवर होता. काही अहवालांनुसार, म्यानमारमध्ये अजूनही हलक्या स्वरुपाचे भूकंपाचे धक्के जाणवत आहेत. या भूकंपामुळे म्यानमारच्या मांडले शहरातील प्रसिद्ध अवा ब्रिज (इरावदी नदीवरील पूल) कोसळल्याची माहिती मिळाली आहे. अनेक इमारतींना तडे गेले असून, मोठ्या प्रमाणात हानी झाल्याची भीती व्यक्त करम्यानमारमध्ये झालेल्या शक्तिशाली भुकंपामुळे जगभरात चिंतेचे वातावरण निर्माण झालं आहे. शुक्रवारी सकाळी ११.५० च्या सुमारास म्यानमारमध्ये ७.७ रिश्टर स्केलचा भूकंप झाला. या भूकंपाचा प्रभाव भारत, थायलंड, बांगलादेश आणि चीनसह पाच देशांमध्येही जाणवला. म्यानमार आणि थायलंडमध्ये १६ जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. म्यानमारमधील या तीव्र भूकंपानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चिंता व्यक्त केली आहे. म्यानमारच्या मदतीसाठी भारत मदतीसाठी पूर्णपणे तयार असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं.

शुक्रवारी सकाळी म्यानमारमध्ये ७.७ रिश्टर स्केलचा भूकंप झाल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. भूकंपाचा केंद्रबिंदू मंडाले शहराजवळ होता. या भूकंपामुळे इमारती आणि अनेक घरे उद्ध्वस्त झाली. म्यानमारमध्ये भूकंपामुळे १३ जणांचा मृत्यू झाला. तर २०० लोक जखमी झाले आहेत. थायलंडची राजधानी बँकॉकमध्ये बांधकामाधीन असलेली ३० मजली इमारत कोसळली. या साइटवर ४०० लोक काम करत होते. यापैकी ८० लोक बेपत्ता आहेत, तर तीन जणांचा मृत्यू झाला आहे.

थायलंड आणि म्यानमारमध्ये झालेल्या भूकंपामुळे झालेल्या भीषण विध्वंसाबद्दल पंतप्रधान मोदींनी शोक व्यक्त केला आहे. भूकंपाच्या विध्वसांमुळे थायलंडमध्ये उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत. बँकॉकमध्ये आणीबाणी लागू करण्यात आली आहे.मोठ्या इमारती कोसळल्यामुळे थायलंडमध्ये सध्या अनेक लोक बेपत्ता आहेत. बचाव पथकांकडून मदत आणि बचावकार्य सुरू आहे भूकंपामुळे म्यानमारमध्ये हजारो लोकांचा मृत्यू झाल्याची भीती व्यक्त केली जात आहे.ण्यात आली आहे. शुक्रवारी म्यानमारमध्ये ७.७ आणि ६.४ तीव्रतेचे सलग दोन भूकंप झाले. म्यानमारमधील मंडाले येथील इरावती नदीवर बांधलेला प्रसिद्ध अवा पूल कोसळल्याचा दावा केला जात आहे. भूकंपात अनेक इमारतींचेही नुकसान झाले आहे. भूकंप इतका तीव्र होता की त्याचे धक्के सुमारे ९०० किलोमीटर अंतरावर असलेल्या बँकॉकमध्येही जाणवले. म्यानमारमध्ये झालेल्या दोन तीव्र भूकंपाचे धक्के भारतातील मणिपूर आणि मेघालयासह ईशान्येकडील राज्यांमध्ये जाणवले. मेघालयातील पूर्व गारो हिल्समध्ये ४ रिश्टर स्केल तीव्रतेचा भूकंपाची नोंद झाल्याची माहिती राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राने दिली आहे. दरम्यान, म्यानमारला लागून सुमारे ३९० किमी लांबीची आंतरराष्ट्रीय सीमा असलेल्या मणिपूरमध्ये कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्याचे वृत्त नाही.

### भारत शक्य ती सर्व मदत करण्यास तयार - पंतप्रधान मोदींचे आश्वासन

"म्यानमार आणि थायलंडमधील भूकंपानंतरच्या परिस्थिती पाहून मी चिंतेत आहे. सर्वांच्या सुरक्षिततेसाठी आणि कल्याणासाठी प्रार्थना करुयात. भारत सर्वतोपरी मदत करण्यास तयार आहे. यासंदर्भात आम्ही आमच्या अधिकाऱ्यांना तयार राहण्यास सांगितले आहे. याशिवाय, परराष्ट्र मंत्रालयाने म्यानमार आणि थायलंड सरकारच्या संपर्कात राहण्याबाबतही चर्चा केली आहे," असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या एक्स पोस्टमध्ये म्हटलं आहे.





# राज्यातील 64 लाख शेतकऱ्यांना मोठा दिलासा

## ₹2555 कोटी विमा नुकसानभरपाई मिळणार

**मुंबई, दि. २८ प्रतिनिधी**
राज्यातील ६४ लाख शेतकऱ्यांना मोठा दिलासा देणारा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला आहे. या निर्णयानुसार, त्यांच्या बँक खात्यात थेट ₹२५५५ कोटी विमा नुकसान भरपाई जमा होणार आहे. शासनाने विमा कंपन्यांना देय असलेला प्रलंबित राज्य हिस्सा अनुदान म्हणून ₹२८५२ कोटी वितरित करण्यास मंजुरी दिली आहे.



या निर्णयामुळे मागील काही हंगामांतील प्रलंबित विमा नुकसान भरपाई शेतकऱ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर थेट जमा केली जाणार आहे. या प्रक्रियेस गती देण्यासाठी विमा कंपन्यांना तातडीने ही रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्याच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. यामुळे शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळणार असल्याचे कृषी मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी सांगितले.

**राज्यातील शेतकऱ्यांना मिळणाऱ्या विमा नुकसान भरपाईचे वितरण खालीलप्रमाणे असेल :**
**खरीप आणि रब्बी – ₹२.८७ कोटी**
**खरीप २०२३ – ₹१८१ कोटी**
**रब्बी २०२३-२४ – ₹६३.१४ कोटी**
**खरीप २०२४ – ₹२३०८ कोटी**

### शासनाचा तातडीने अंमलबजावणीचा निर्धार

शासनाने विमा कंपन्यांना निधी वितरित केला असून, ही नुकसान भरपाई शेतकऱ्यांच्या खात्यावर तातडीने जमा केली जाईल. यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य मिळेल आणि त्यांना शेतीसाठी नवीन आर्थिक आधार निर्माण होईल.

या निर्णयामुळे राज्यातील लाखो शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून, शासनाच्या या पावलामुळे शेती क्षेत्राला बळकटी मिळेल, असे कृषी मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी स्पष्ट केले.

# मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना सुरुच राहणार

**मुंबई, दि. २८ प्रतिनिधी**
मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना/वीज दर सवलत योजनेचा कालावधी वाढवण्यात आला आहे. शासनाकडून एप्रिल २०२४ ते मार्च २०२९ पर्यंत ही योजना सुरु ठेवण्याचे संकेत देण्यात आले आहेत. त्यामुळे राज्यातील लाखो कृषी पंप शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाल्याचे स्पष्ट झाले आहे.

राज्य सरकारकडून महावितरणला एकाच दिवशी दोन मोठे निधी वर्ग करण्यात आले आहेत. यामध्ये शेतकऱ्यांच्या मोफत वीज योजनेसाठी २ हजार ०२६ कोटी आणि बळीराजा मोफत वीज योजनेंतर्गत १ हजार ८०० रुपये कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत. राज्यातील ७.५ एचपी कृषी पंप ग्राहकांना मोफत वीज देण्यात येते. अधिवेशनादरम्यान विरोधी पक्षांकडून ही योजना सरकारकडून गुंडाळण्यात



आल्याचा आरोप होत होता, दरम्यान, सरकारने लाखो शेतकऱ्यांना मोठा दिलासा देणारा निर्णय घेतला आहे.

महाराष्ट्र शासन उद्योग, ऊजा,कामगार व खनिकर्म विभागाने प्रसिद्ध केलेल्या जीआरमध्ये म्हटले आहे की, कृषिपंप शेतकऱ्यांना मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना/वीज दर सवलतीसाठी योजनेकरिता सन २०२४-२५ मधील मार्च, २०२५ च्या अधिवेशनात पुरवणी मागणीद्वारे तरतूद करण्यात आलेली रु.१८००,००,००,०००/- (एक हजार आठशे कोटी रुपये फक्त) रक्कम महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीला रोखीने वितरित करण्यास या शासन निर्णयाद्वारे मंजूरी देण्यात येत असल्याचे म्हटले आहे. तसेच यापुढे देखील राज्यातील ७.५ एचपी कृषिपंप ग्राहकांना पाच वर्षांसाठी मार्च २०२४ ते मार्च २०२९ पर्यंत मोफत वीज देण्यात येणार असून त्यासाठी प्रतिवर्षी लागणारा निधी अनुदान स्वरूपात महावितरण कंपनीस अदा करण्यात येणार असल्याचेदेखील स्पष्ट करण्यात आले आहे. सदर शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेली रक्कम ही फक्त कृषीपंप ग्राहकांना मंत्री बळीराजा मोफत वीज योजना / वीज दर सवलतीपोटीच खर्च होईल याची दक्षता ऊर्जा कार्यासन आणि महावितरण कंपनीने घ्यावी, तसेच ज्या उद्देशासाठी सदर निधी मंजूर करण्यात आला आहे, त्याच उद्देशासाठी तो उपयोगात आणला जाईल याची जबाबदारी महावितरण कंपनीची राहील, असेदेखील जीआरमध्ये स्पष्ट म्हटले आहे.

# कोरटकरचा पोलीस कोठडीतील मुक्काम वाढला

**कोल्हापूर, दि. २८ प्रतिनिधी**
कोल्हापुरातील इतिहास अभ्यासक इंद्रजित सावंत यांना धमकी दिल्याप्रकरणी आणि छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्याबद्दल अवमानकारक विधान केल्याप्रकरणी प्रशांत कोरटकरला अटक केली आहे. त्याच्या जामीन अर्जावर आज कोल्हापूर जिल्हा सत्र न्यायालयात युक्तीवाद झाला. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद एकल्यानंतर कोरटकरला दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली.

वकील असीम सरोदे यांनी युक्तीवाद करताना म्हटले की, प्रशांत कोरटकर खोटारडे आहेत, हे समोर आले आहे. त्याने पुरावे नष्ट केले आहेत, हे स्पष्ट होत आहे. एका सट्टा बुकीच्या तो संपर्कात आहे. त्याची माहिती समोर येणे सुद्धा आता गरजेचे आहे. कोरटकर ६ ते ७ ठिकाणी राहिला आहे. त्यामुळे त्या त्या वेळी त्याने वेगवेगळ्या गाड्या वापरल्या आहेत. त्यामुळे त्याचा तपास गरजेचा आहे त्यामुळे त्याला पोलीस कोठडीत ठेवणे गरजेचे आहे. कोरटकर यांने ज्या गाडीतून प्रवास केला, त्या धीरज चौधरी याची गाडी जप्त करण्यात आली आहे. ज्या हॉटेलमध्ये राहिला त्या हॉटेल मालकांना तपासकामी उपस्थित राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. ५ ते ६ वेग वेगवेगळ्या ठिकाणी तो फिरला आहे. त्यावेळी वेगवेगळ्या गाड्या वापरल्या आहेत. पत्रकार आहे, असे सांगतो आणि केवळ जुजबी माहिती देतो. कोणत्या संघटना त्याला मदत करत असतील, तर त्यांचा काय उद्देश आहे?, त्याला आर्थिक मदत कोणी केली याची माहिती आम्ही घेत आहे, हे सुद्धा कोरटकरच्या चौकशीतून पुढे येणार आहे. कोरटकरला ज्यांनी मदत केली आणि जी नावे समोर आली आहेत. त्या लोकांचा मूळ काय उद्देश होता का? आणि आरोपींचा काय उद्देश होता का ? हे तपासणे गरजेचे आहे. त्या सर्वांसोबत कोरटकरची चौकशी होणे गरजेचे आहे, असा युक्तीवाद सरकारी वकील सूर्यकांत पवार यांनी यावेळी केला.

तो फरार होता, त्याच्या तपासाबाबत सांगितले जात आहे. पण मूळ केस काय आहे, ते सांगा. जातीय तेढ निर्माण केली जात आहे, असे सांगितले जात आहे, पण मुळात सोशल मीडियात व्हिडिओ कुणी टाकला? त्याचा आवाज कोणीतरी AI तंत्रज्ञानाद्वारे मोर्फ केला, याबाबतची तक्रार कोरटकरने नागपूर पोलिसांत दिली आहे.

कोरटकर ६५ कोटींच्या गाडीतून फिरतो, असे सावंत यांचे वकील सांगतात. मात्र भारतात अशी गाडी नाही. त्याला सुद्धा धमक्या आल्या आहेत. त्याच्या घरी त्याची आई आणि बायको, मुलगी आहे, असा युक्तीवाद करत आता चौकशी झाली आहे. त्यामुळे न्यायालयीन कोठडी द्यावी, अशी विनंती कोरटकर याचे वकील सौरभ घाग यांनी केली.

## कोरटकरवर वकिलाकडून हल्ल्याचा प्रयत्न

कोल्हापूर सत्र न्यायालयात सुनावणीसाठी आणण्यात आलेल्या प्रशांत कोरटकरवर वकिलाने हल्ला करण्याचा प्रयत्न केला. मोठा पोलिस बंदोबस्त असताना देखील कोरटकरवर हल्ल्याचा प्रयत्न झाल्याने न्यायालय परिसरात खळबळ उडाली. पोलिसांनी वेळीच हल्ला करणाऱ्या वकिलाला आवरल्याने मोठा अनर्थ टळला. ये पश्या.. म्हणत ते कोरटकरच्या दिशेने धावले असता पोलिसांनी तात्काळ त्यांना धरुन बाजुला केले. सुनावणीनंतर त्याला कोठडीकडे नेताना पोलिसांच्या गराड्यातच वकील अमितकुमार भोसले (रा. रुकडी, ता. हातकणंगले) याने ए हरामखोर परशा, छत्रपती शिवाजी महाराजांच्या विषयी तू आक्षेपार्ह बोलतोस, असे बोलत त्यांच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. सुमारे पन्नासहून अधिक पोलिसांच्या उपस्थितीत त्याने हा प्रयत्न केल्याने पोलिस यंत्रणा पूर्णपणे हडबडून गेली. पोलिसांनी त्याला तात्काळ ताब्यात घेऊन त्याचे तोंड दाबले. त्याला न्यायालयाच्या बेसमेंटमध्ये असलेल्या कॅन्टीनमध्ये थोडा वेळ थांबवून ताब्यात घेतले. या घटनेने वातावरण तणावपूर्ण बनले.



# केंद्रीय सरकारी कर्मचाऱ्यांसाठी खुशखबर!

## महागाई भत्त्यात वाढ

**नवी दिल्ली, दि. २८ वृत्तसंस्था**
नवीन आर्थिक वर्ष सुरु होण्यापूर्वी केंद्र सरकारने केंद्रीय सरकारी कर्मचाऱ्यांना खुशखबर दिली आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाने शुक्रवारी केंद्रीय सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात २ टक्के वाढ करण्यास मंजुरी दिली. या निर्णयामुळे महागाई भत्ता ५३ टक्क्यांवरून ५५ टक्क्यांपर्यंत जाईल. यामुळे आठव्या वेतन आयोगापूर्वी कर्मचाऱ्यांच्या पगारात वाढ होईल. याआधी जुलै २०२४ मध्ये डीए ५० टक्क्यांवरून ५३ टक्क्यांपर्यंत वाढवण्यात आला होता.



केंद्रीय मंत्रिमंडळाने महागाई भत्त्यात वाढ केल्याने त्याचा फायदा ६८ लाखांहून अधिक कर्मचारी आणि सुमारे ४२ लाख पेन्शनधारकांना होईल. महागाई भत्ता (डीए) हा सरकारी कर्मचाऱ्यांना महागाईपासून दिलासा देणारा आणि त्यांचे वेतन राहणीमानाच्या वाढत्या खर्चाशी सुसंगत राहावे, यासाठी दिला जाणारा आर्थिक लाभ समजला जातो.

केंद्र सरकारकडून दरवर्षी होळी आणि दिवाळी सणांपूर्वी दर दोन वर्षांनी महागाई भत्त्यात वाढीची घोषणा केली जाते. पण यावेळी होळीच्या सणाआधी याबाबत काही घोषणा करण्यात आली नव्हती. दरम्यान, महागाई भत्ता हा कर्मचाऱ्यांच्या शहरी, निमशहरी आणि ग्रामीण भागातील कार्यस्थळावर अवलंबून असतो. त्यामुळे प्रत्येकाच्या पदानुसार आणि कामाच्या ठिकाणानुसार तो कमी-जास्त असू शकतो.

# कामराला मद्रास उच्च न्यायालयाकडून अटकपूर्व जामीन

**चेन्नई, दि. २८ वृत्तसंस्था**
स्टँडअप कॉमेडिअन कुणाल कामराने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर विडंबनात्मक गाणं रचून ते सादर केल्यानंतर नव्या वादाला तोंड फुटलं होतं. या प्रकरणात कुणाल कामराच्या विरोधात शिवसेना (शिंदे) पक्षाचे कार्यकर्ते आक्रमक झाले होते. तसेच या प्रकरणी कुणाल कामराविरोधात गुन्हा देखील दाखल झाला. त्यामुळे कुणाल कामरा चांगलाच वादाच्या भोवऱ्यात अडकला. दरम्यान, आता कुणाल कामराने आज मद्रास उच्च न्यायालयात धाव घेतली असून अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला होता. त्यानुसार त्याला ७ एप्रिल पर्यंत अटक न करण्याचे आदेश मद्रास उच्च न्यायालयाने दिले आहेत.

### 31 मार्च रोजी मुंबईत चौकशीसाठी हजर होणार

कुणाल कामराने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर विडंबनात्मक गाणं सादर केल्याने राज्याचं राजकारण चांगलंच तापल्याचं पाहायला मिळालं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील यावर भाष्य करत कारवाई करण्याचे संकेत दिले होते. तसेच कुणाल कामराच्या गाण्यावरील वादावार राजकीय वर्तुळातून अनेकांच्या प्रतिक्रिया देखील समोर आल्याचं पाहायला मिळालं होतं. यानंतर मुंबई पोलिसांनी कुणाल कामराच्या विरोधात गुन्हा दाखल केला होता. तसेच चौकशीसाठी कुणाल कामराला नोटीस देखील बजावण्यात आल्याची माहिती समोर आली होती. दरम्यान, कुणाल कामरा ३१ मार्च रोजी मुंबईत पोलिसांसममोर चौकशीसाठी हजर होणार व ७ एप्रिलपूर्वी मुंबई उच्चन्यालायात अटकपूर्व जामीनासाठी अर्ज करणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

# दिशाच्या वडिलांनी मुलीच्या मृत्यूआडून राजकारण करू नये – संजय राऊत

**मुंबई, दि. २८ प्रतिनिधी**
बॉलिवूड अभिनेता सुशांत सिंह राजपूतची माजी मॅनेजर दिशा सालियनच्या मृत्यू प्रकरणावरून ठाकरे गटाचे शिवसेना खासदार संजय राऊत यांनी मोठा आरोप केला आहे. दिशाच्या वडिलांनी मुलीच्या मृत्यूचा वापर करून राजकारण करू नये, अशी टीका त्यांनी केली.

दिशा सालियनच्या मृत्यू प्रकरणी गेल्या काही दिवसांपासून राजकीय वातावरण तापले आहे. आता या प्रकरणात मालवणी पोलिसांनी दिलेल्या क्लोजर रिपोर्टमधून धक्कादायक खुलासे समोर आले आहेत. या अहवालानुसार, दिशाच्या आत्महत्येमागे कौटुंबिक कारणे आणि आर्थिक विवंचना जबाबदार होती.

या पार्श्वभूमीवर संजय राऊत म्हणाले, "काल पोस्टमार्टमचा रिपोर्ट आला असून, आमच्यासाठी हा विषय संपला आहे. आपल्या मुलीच्या मृत्यूचा आधार घेत राजकारण करू नका. शवविच्छेदन अहवालातून सत्य समोर आले आहे."

ते पुढे म्हणाले, "त्या मुलीला डिप्रेशन होतं, हे तिच्या कुटुंबाचा आणि वैयक्तिक आयुष्याचा भाग आहे. आम्हाला त्यावर राजकारण करायचे नाही. मात्र, आता पाच वर्षांनी तिच्या वडिलांना हाताशी धरून काही लोक राजकारण करत आहेत, त्यांना लखलाभ होवो!"

संजय राऊत यांनी शिवसेना शिंदे गटावरही जोरदार हल्ला चढवला. त्यांनी म्हटले, "आम्ही कुठल्याही गोष्टीला तोंड देण्यासाठी समर्थ आहोत. मात्र, या प्रकरणाचा वापर करून काही लोक महाराष्ट्राच्या पहिल्या क्रमांकाच्या ठाकरे कुटुंबावर चिखलफेक करू इच्छित आहेत. बाळासाहेब ठाकरेंचे फोटो लावून स्वतःला त्यांचे विचार वाहक म्हणणाऱ्यांनी लाज बाळगली पाहिजे."

दिशा सालियनच्या मृत्यू प्रकरणावरून आता राजकीय आरोप-प्रत्यारोप वाढले असून, शिंदे गट आणि ठाकरे गटामध्ये नवीन संघर्ष निर्माण झाला आहे. संजय राऊत यांच्या या वक्तव्यावर शिंदे गटाकडून काय प्रत्युत्तर दिले जाते, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# संतोष देशमुख हत्या प्रकरणात नवे वळण; आरोपींनी जबाबात घेतले सुग्रीव कराडचे नाव

**बीड, दि. २८ प्रतिनिधी**
मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात आता आणखी एक नवं वळण आलं आहे. या गुन्ह्यात वाल्मीक कराडसह ८ जणांवर दोषारोपपत्र दाखल असून अद्यापही कृष्णा आंधळे हा आरोपी फरार आहे. आता हत्येतील आरोपी जयराम चाटे यांनी कबुली जबाबात सुग्रीव कराडचा उल्लेख करत वेगळाच दावा केला आहे. सुग्रीव कराडच्या सांगण्यावरून संतोष देशमुख आणि इतरांनी खंडणी मागायला गेलेल्या सुदर्शन घुले आणि त्याच्या मित्रांना मारहाण केली होती. त्यातून झालेली बदनामी आणि खंडणीत आड येत असल्याने संतोष देशमुखची हत्या केली असं चाटे याने म्हटलं आहे.

संतोष देशमुख आपल्याला मारहाण करू शकत नाही या मारहाणीमागे सुग्रीव कराडचा हात असावा अशी शंका आरोपींना होती. त्यातूनच संतोष देशमुखच्या अपहरणाचा कट रचला. देशमुखांच्या अपहरणापूर्वी त्यांनी आपल्या व्हॉट्सअपला बाप तो बाप रहेगा असं कॅप्शन लिहून सुदर्शन घुले, प्रतीक घुले यांच्या मारहाणीचा स्टेटस ठेवला होता. त्याचा राग



सुदर्शन घुले आणि गँगला होता. त्यातूनच सुदर्शन घुलेने अपमानाचा बदला म्हणून संतोष देशमुखचं अपहरण केले आणि त्याला मारहाण करत आपण सगळ्यांचे बाप आहोत हे दाखवून द्यायचे होते असं जबाबात म्हटलं आहे. संतोष देशमुख यांना मारहाण करताना त्यांच्या तोंडून सुग्रीव कराड आले होते. आवादा कंपनीच्या आवारात सुदर्शन घुले आणि इतरांना जी मारहाण झाली ती सुग्रीव कराडच्या सांगण्यावरून झाली होती. बीच बाबत सुदर्शन घुलेला सहन झाली नाही. त्यामुळे बदला घेण्यासाठीच संतोष देशमुख यांना उचलून मारहाण करण्यात आली असा स्पष्ट उल्लेख जयराम चाटेने त्याच्या जबाबात केला आहे. सुग्रीव कराड आणि वाल्मीक कराड हे रक्ताचे नातेवाईक नाहीत. सुग्रीव हा आधी धनंजय मुंडे यांचा कार्यकर्ता होता. परंतु लोकसभा निवडणुकीत त्याची भूमिका संशयास्पद राहिल्याने सुग्रीवला धनंजय मुंडे यांनी बाजूला केले. त्यानंतर तो बजरंग सोनावणेचे काम करत होता. २०२२ च्या केज नगरपंचायत निवडणुकीत सुग्रीव कराड उभा होता. त्याने विद्यमान खासदाराच्या मुलीचा पराभव केला होता. सुग्रीव अनेक वर्षापासून केजमध्ये राहायला आहे. तो राजकीय क्षेत्रातही कार्यरत आहे. त्याची आई पंचायत समिती सदस्या तर पत्नी नगरसेविका आहे. सुग्रीव कराडवर मारहाण, खून, दरोडा, दंगलीचे गंभीर गुन्हे दाखल आहेत. दरम्यान, कोण सुग्रीव कराड, त्याचा या प्रकरणात काहीही संबध नाही. हे प्रकरण आकाच्या सांगण्यावरूनच झाले हे कबुल केले आहे. इतक्या क्रूरपद्धतीने संतोष देशमुख यांना मारण्यात आले आहे. देशातच नव्हे जगात कुठेही अशी निघृण हत्या कुणी केली नसेल असे आमदार सुरेश धस म्हणाले.

**महत्त्वाचे**

## शिवसेना इगतपुरी उपशहर प्रमुखपदी विष्णू डावखर

**इगतपुरी ।** शिवसैनिक विष्णू भीमा डावखर यांच्या पक्ष कार्याची दखल घेत त्यांची शिवसेनेच्या इगतपुरी उपशहर प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. डावखर यांची उपशहराध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आल्याने त्यांचे अभिनंदन केले जात आहे. हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या सुचनेनुसार, तसेच शिवसेना सचिव भाऊसाहेब चौधरी, शिवसेना उपनेते संपर्क प्रमुख विजय करंजकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपजिल्हाप्रमुख मोहन बऱ्हे, तालुका प्रमुख देविदास जाधव आणि इगतपुरी शहरप्रमुख भूषण जाधव यांच्या उपस्थितीत विष्णु डावखर यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. शिवसेना पक्ष वाढीसाठी आपण सर्वांना सोबत घेऊन कार्य करून पक्ष वाढीसाठी व नागरिकांच्या समस्या कायमस्वरूपी सोडवण्यासाठी प्रयत्न करु, असा विश्वास यावेळी विष्णु डावखर यांनी व्यक्त केला. या प्रसंगी भागीरथ डावखर, मच्छिंद्र डावखर, गंगा लहाने, अर्जुन पाटील, अविनाश डावखर, विकी गवई, दिपक डावखर, संकेत डावखर, आकाश डावखर, अजय तांबे, हनुमान शेलार आदी उपस्थित होते.

# फुलेंच्या भारतरत्न पुरस्कारासाठी दोन शिक्षकांची प्रामाणिक लढाई

**नाशिक ।** क्रांतिसूर्य महात्मा फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांना भारतरत्न पुरस्कार देण्याबाबत विधानसभेत विनाचर्चा एकमुखाने ठराव मंजूर झाला. यामुळे एक तपाहून अधिक काळ या मागणीसाठी प्रयत्नशील असलेल्या नाशिकच्या दोन शिक्षकांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत.

महात्मा जोतीराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांना मरणोत्तर भारतरत्न द्यावा ही त्यांची मागणी राज्य शासनामार्फत अनेक वर्षापासून केंद्राकडे प्रलंबित आहे. फुले दाम्पत्यांना त्यांचे शिक्षण, आरोग्य, शेती व सामाजिक समता या विषयांवरील कार्य व योगदान लक्षात घेता भारतरत्न पुरस्काराने गौरवण्यात यावे. यासाठी २०१२ पासून नाशिक मधील सुखदेव प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक नितीन पाटील तसेच सुखदेव माध्यमिक व ज्युनियर कॅालेजचे प्राचार्य बाबासाहेब खरोटे यांनी सह्यांची मोहीम राबवली होती.

नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव व इतर जिल्ह्यातील विविध शाळांच्या मुख्याध्यापक व शिक्षकांकडून याबाबत सह्या मागवल्या होत्या. त्याला राज्यभरातून मोठा प्रतिसाद मिळाला. अवघ्या आठ महिन्यात अकरा हजार सह्या जमा झाल्या. शिक्षक बांधवाची ही व्यापक अपेक्षा शासन दरबारी करण्यासाठी मांडण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन या मागणीबाबत केंद्राकडे पुन्हा पाठपुरावा करावा अशी विनंती करण्यात आली होती. तसेच मंत्री सुधीर मुनगट्टीवर, तत्कालीन पालकमंत्री छगन भुजबळ, माजी केंद्रीय आरोग्य मंत्री डॉ. भारती पवार, खासदार सुप्रिया सुळे व खासदार डॉ.अमोल कोल्हे, माजी खासदार हेमंत गोडसे यांना देखील याबाबतचे



निवेदन देण्यात आले होते. राज्यपाल कार्यालयालाही ११ हजार शिक्षकांच्या सह्यांची प्रत व निवेदन देण्यात आली होती. हे दोन शिक्षक या मागणीसाठी सातत्याने पाठपुरावा करत होते. सभागृहात फुले दांपत्याच्या भारतरत्न पुरस्काराबाबत जयकुमार रावल यांनी ठराव मांडला.

या ठरावाचे छगन भुजबळ यांनी स्वागत केले. विना चर्चा हा ठराव मंजूर करत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. अनेक वर्षांपासून असलेली मागणी पूर्णत्वाकडे जात असल्याचे दिसून येत असल्याने मागणी करणाऱ्या शिक्षकांनी आनंद व्यक्त केला आहे.

> फुले दांपत्याना मरणोत्तर भारत रत्न पुरस्कार देऊन त्यांना गौरवावे अशी शिक्षक म्हणून आमची इच्छा आहे. त्यासाठी आम्ही अकरा हजार शिक्षकांच्या सह्या घेतल्या. वारंवार त्याचा पाठपुरावा केला. विधासभेत याबाबत ठराव मंजूर झाल्याने आशा पल्लवित झाल्या आहेत.
>
> – **नितीन पाटील, मुख्याध्यापक, सुखदेव प्राथमिक विद्यामंदिर**

> तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आम्ही भेट घेतली होती. त्यांनी त्यावेळी आश्वासन दिले होते. आज पुन्हा देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री आहेत आणि फुले दांपत्य भारतरत्न बाबत ठराव मंजूर करण्यात आला. त्यास लवकर मुर्त स्वरूप प्राप्त होवो व समर्थन देणाऱ्या सर्व शिक्षकांची इच्छा पूर्ण व्हावी.
>
> – **बाबासाहेब खरोटे, प्राचार्य,** सुखदेव विद्यामंदिर व ज्यु. कॉलेज

## 'आता थांबायचं नाय' चित्रपटाचं शीर्षक गीत प्रदर्शित

**नाशिक ।** महाराष्ट्राच्या मातीतील एका प्रेरणादायी सत्यकथेवर आधारित 'आता थांबायचं नाय' हा नवा मराठी चित्रपट १ मे पासून प्रदर्शित होणार आहे. महिलादिनी झी स्टुडिओज, चॉक अँड चीज फिल्म्स आणि फिल्म जॅझ यांनी 'आता थांबायचं नाय' या चित्रपटाचा टीझर प्रदर्शित केला होता. आता ह्याच




सिनेमाचं मनाला भिडणारं शीर्षक गीत 'आता थांबायचं नाय' प्रदर्शित झालंय. हे गाणं असं सेलिब्रेशन आहे जे जीवनाच्या नवीन प्रवासाचा, उंच भरारी घेण्याचा, नवे स्वप्न पाहण्याचा आणि ते पूर्ण करण्यासाठी घेतलेला ध्यासाचा आनंद व्यक्त करते. या गाण्याचे वैशिष्ट्य म्हणजे मराठी सिनेसृष्टीतील अनेक उत्तम कलाकार ह्या एका गाण्यात आहेत.

'आता थांबायचं नाय' हे गाणं मनामनावर प्रभाव पडणारे असून या गाण्याला अजय गोगावले यांचा आवाज लाभला आहे, या गाण्यात त्यांचा आवाज अतिशय आल्हाददायक वाटतो. तर गायिका आनंदी जोशी हिने सुद्धा आपल्या सुरांनी या गाण्याला साज चढवला आहे. या सिनेमासाठी गुलराज सिंग यांनी सर्व गाणी संगीतबद्ध केली आहेत, तर मनोज यादव हे गीतकार आहेत. प्रेरणादायक आणि सकारात्मक ऊर्जा देणारं हे गाणं प्रत्येक वयोगटातील व्यक्तीसाठी आहे. गायक अजय गोगावले ह्यांनी या वेळी आपलं मत व्यक्त करताना सांगितलं,"संगीताच्या माध्यमातून प्रेक्षकांना प्रेरणा देणं आणि सकारात्मक विचार देणं हे खूप महत्त्वाचे आहे, आता थांबायचं नाय हे गाणं माझ्यासाठी खूप खास आहे, गाणं गाण्यापूर्वी त्यामागची गोष्ट समजून घेण्यावर मी भर देतो. त्यामुळे हे माझं भाग्य आहे कि अशा प्रेरणादायी संदेश देणाऱ्या चित्रपटाचा मी एक भाग आहे" शिवराज वायचळ दिग्दर्शित या चित्रपटात भरत जाधव, सिद्धार्थ जाधव, प्राजक्ता हनमघर, किरण खोजे, ओम भुतकर, पर्ण पेठे, प्रवीण डाळिंबकर, रूपा बोरगांवकर त्याच बरोबर रोहिणी हट्टंगडी आणि आशुतोष गोवारीकर यांच्या प्रमुख भूमिका आहेत. उमेश कुमार बन्सल, बवेश जानवलेकर, निधी हिरानंदानी आणि धरम वालिया हे सिनेमाचे निर्माते आहेत. हा चित्रपट केवळ एक मनोरंजक अनुभव नाही, तर तो जीवनातील आव्हानांना सामोरे जाण्याची शिकवण देणारा एक प्रेरणादायी प्रवास आहे. हा सिनेमा महाराष्ट्रदिनी म्हणजेच १ मे पासून प्रदर्शित होणार आहे.

# वाणिज्य शाखेच्या ५० विद्यार्थ्यांना मिळाला रोजगार

### सीए नाशिक शाखा आणि मविप्रचा पहिल्यांदाच प्लेसमेंट ड्राइव्ह

**नाशिक ।** द इन्सिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौन्टटन्टस ऑफ इंडियाच्या (आयसीएआय) नाशिक शाखेतर्फे मविप्रच्या केटीएचएम महाविद्यालयात वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी 'प्लेसमेंट ड्राइव्ह' झाला. त्यात १४ सीए फर्म सहभागी झाल्या. या फर्मनी सुमारे ५० विद्यार्थ्यांची निवड केली. त्यामुळे या विद्यार्थ्यांना रोजगाराची मोठी संधी मिळाली आहे. विशेष म्हणजे नाशिकमध्ये पहिल्यांदाच असा प्लेसमेंट ड्राइव्ह घेण्यात आला असून, यामध्ये दिव्यागांनाही रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.



याप्रसंगी मविप्रचे शिक्षणाधिकारी डॉ. नितीन जाधव, डॉ. अजित मोरे, आयसीएआय नाशिकचे अध्यक्ष सी. ए. जितेंद्र फाफट, उपाध्यक्ष सीए अभिजित मोदी, खजिनदार सी. ए. विशाल वाणी, प्राचार्य डॉ. एस. एस. काळे, उपप्राचार्य डॉ. वसंत बोरस्ते, वाणिज्य विभागप्रमुख डॉ. सुजाता गडाख तसेच आयसीएआयचे सचिव सीए मनोज तांबे, विद्यार्थी शाखेचे अध्यक्ष सीए दिलीप बोरसे, सीए रोहन कुलकर्णी, सीए शुभम मुंदडा, सीए पियुष चांडक, सीए आशिष त्रिवेदी, सीए भारत सचदेव, सीए प्रतिक भुतडा, सीए स्वप्निल मोदी, सीए हितेश तातिया, सीए पियुष संत, सीए प्रशांत कुलकर्णी, सीए निखिल धामणे, सीए महेंद्र कानडे, सीए सचिन कोठावदे, सीए अंकित मणियार, सीए सागर कोठावदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

सी.ए. जितेंद्र फाफट म्हणाले की, सीए क्षेत्राची व्याप्ती आणि कार्य दिवसेंदिवस वाढतच आहे. त्यासाठी कुशल मनुष्यबळाची आवश्यकता आहे. सीए फर्ममध्ये काम केल्यामुळे वाणिज्यच्या विद्यार्थ्यांना बँका व खासगी संस्थांची कार्यप्रणाली जवळून अभ्यासण्याची संधी मिळते. विद्यार्थ्यांनी चिकाटीने काम करून आपली प्रगती साधावी, असेही ते म्हणाले. मविप्रचे शिक्षणाधिकारी डॉ. नितीन जाधव म्हणाले की, विद्यार्थ्यांनी तत्पर, तेजस्वी असावे. मोठी स्वप्ने पाहताना यशासाठी शार्टकट शोधू नका. कठोर कष्ट करा. केवळ स्पर्धा परीक्षांच्या मागे न लागता करिअरच्या नवीन वाटा शोधल्या तर जीवनात कधीच निराशा येत नाही. प्राचार्य डॉ. काळे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी अविश्रांतपणे प्रगती करत रहावी. देशाच्या प्रगतीचा वेग पाहता सीए व्यवसायाला उज्वल भवितव्य आहे. कौशल्याला बुध्दीमत्ता, कष्ट व नियोजनाची जोड दिली तर विद्यार्थ्यांना कोणत्याही क्षेत्रात यश नक्कीच प्राप्त होईल. शिक्षणाधिकारी डॉ. अजित मोरे म्हणाले की, मविप्र संस्थेतील विद्यार्थ्यांसाठी विविध नामवंत संस्थांच्या माध्यमातून नियमितपणे रोजगाराच्या संधी उपलब्ध केल्या जात आहेत. विद्यार्थ्यांनी प्लेसमेंट संधीचा लाभ घेत आपला व संस्थेचा नावलौकिक वाढवावा. डॉ. सुजाता गडाख यांनी प्रास्तविकात विभागाची प्रगती व उपक्रमांची माहिती दिली. प्लेसमेंट सेलचे प्रमुख प्रा. दिगंबर उफाडे, प्रा. तुषार पाटील आदींसह प्राध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते. प्रा. संदीप कसबे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. सोपान देशमुख यांनी आभार मानले.

## पिंपळगाव महाविद्यालयात उद्योजकता विषयावर व्याख्यान

**पिंपळगाव बसवंत ।** कष्ट करण्याची तयारी, सातत्यता, बाजारातील संधी, उत्तम नियोजन, व्यवस्थापन या गोष्टी आपल्याकडे असतील तर उद्योजकीय दृष्टिकोन नक्कीच तयार होतो. जर आजच्या स्पर्धात्मक युगात आपल्याला टिकायचे असेल तर कोणत्याही स्पर्धेला सामोरे जाण्याची तयारी ठेवावी लागेल. कदाचित अपघाताने सुद्धा एखाद्या व्यवसायात आपण आपल्या कार्याचा ठसा निर्माण करू शकतो. फक्त संधी ओळखण्याची जिद्द आपल्या मनात हवी, म्हणूनच सामाजिक गरजेतून व्यवसायाच्या संधी ओळखा शिका, असे प्रतिपादन नवोद्योजक प्रवीण मोगल यांनी केले.

मविप्र समाजाचे, कर्मवीर काकासाहेब वाघ पिंपळगाव बसवंत महाविद्यालयात वाणिज्य विभागांतर्गत उद्योजकता विकास या विषयावर व्याख्यानात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर मविप्र शिक्षणाधिकारी शशिकांत मोगल, वाणिज्य विभागप्रमुख डॉ. एस. के. मोरे, प्रा. संदीप माळी, प्रा भगवान कडलक, प्रा सविता कदम प्रा. सागर संधान, प्रा. विनय कदम, प्रा.मंजुषा भंडारे, प्रा. गायत्री पाचोरकर, प्रा. भूषण गडाख, प्रा.सानवी बेजेकर आदी उपस्थित होते. यावेळी मविप्र शिक्षणाधिकारी शशिकांत मोगल आपल्या मनोगतात म्हणाले की, आपल्या कौशल्यात्मक शिक्षणातून आपल्या हाताला रोजगार उपलब्ध होऊ शकतो. आपली आवड ओळखून क्षेत्र निश्चित करावे. सूत्रसंचालन प्रा. सविता कदम यांनी केले तर प्रा. भगवान कडलक यांनी आभार मानले. कार्यक्रमाला यावेळी वाणिज्य विभागातील बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

## कलाकार-दिग्दर्शकमधील सेतू साधणारा कला दिग्दर्शक : वैभव वाघ

**ना**ट्य-सिने क्षेत्रात "कास्टिंग डायरेक्टर" अर्थात "कला दिग्दर्शक" वेगळी ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न सांस्कृतिक नाशिक नगरीतील रहिवाशी वैभव सुरेश वाघ हा तरुण जिद्दीने करतोय. नाटक, मराठी-हिंदी चित्रपट, वेब सिरीज, सिरियल्ससाठी निर्माते/दिग्दर्शकला त्यांच्या मागणीनुसार कलाकार उपलब्ध करून देणारा मधला दुवा कला दिग्दर्शक अर्थात कास्टिंग डायरेक्टर म्हणून वैभव वाघ काम करतात.



रंगभूमीशी नाळ जुळलेला हा कलाकार अभिनयापेक्षा या क्षेत्राशी निगडीत कास्टिंग डायरेक्टर यात रमला. कास्टिंग डायरेक्टर म्हणजे नेमके काय काम असते असा साहजिकच लोकांना प्रश्न पडतो. कलाकारांना कास्टिंग डायरेक्टरच्या माध्यमातून नाटक, मराठी-हिंदी चित्रपट, वेब सिरीज, सिरियल्स, जाहिरात आदींच्या निर्माते/दिग्दर्शकापर्यंत पोहोचविणारा दुवा म्हणून कास्टिंग डायरेक्टर काम करीत असतो. त्यामुळे कलाकारांनाही चांगली मदत होते आणि निर्माते/दिग्दर्शकाचेही काम सोपे होते. वैभव वाघ यांनी हाच धागा पकडत त्यांचे कास्टिंग डायरेक्टरचे काम सुरू केले अन त्यातच स्वतःला वाहून घेतले. तेही एक कलाकाराच आहेत. अन्य कलाकारांसाठी ते पडद्याआडील कलाकार म्हणून भूमिका बजावतात. १९९६ पासून ते हे काम करीत असले तरी खऱ्या अर्थाने २०११ पासून त्यांच्या कामाला गती लाभली. आतापर्यंत त्यांनी साधारपणे २५ मराठी-हिंदी चित्रपटासाठी कास्टिंग डायरेक्टर म्हणून काम केले आहे. ८ ते १० वेब सिरीज साठी कलाकार पुरविले आहेत. त्यामुळे त्यांचा अनेक छोट्या-मोठ्या प्रसिद्ध कलाकारांशी प्रत्यक्ष संबंध आला. हे करताना त्यांना प्रचंड संघर्ष करावा लागला, अजूनही करावा लागत आहे. त्यांनी या क्षेत्रात एका शॉर्ट फिल्मपासून प्रदार्पण केले. कोणता कलाकार कोणत्या पात्रासाठी योग्य ठरू शकतो याची चाचपणी करून निर्माते/दिग्दर्शकला मागणीनुसार कलाकार पुरविले जातात. २०१० मध्ये एका चित्रपटात त्यांनी कास्टिंग डायरेक्टर म्हणून काम केले. तेव्हापासून त्यांचा या क्षेत्रातील प्रवास नित्य परंतु संघर्षमय असाच सुरू आहे. लेखक असलेल्या नौशाद सय्यद या मित्राच्या सल्ल्याने त्यांनी मुंबई गाठली. नाशिक-मुंबई व प्रसंगी इतर ठिकाणीही ये जा करीत त्यांनी प्रयत्न सुरू ठेवले. सदाशिव अमरापूरकर, गणेश यादव, यतीन कार्यकर अशा प्रसिद्ध कलाकारांचेही वैभवने कास्टिंग केले आहे. जुन्या-नव्या कलाकारांना त्यांच्यामुळे वाव मिळाला आहे, मिळत आहे. त्यांच्या कामाची तळमळ पाहून सदाशिव अमरापूरकर यांनी वैभवच्या पाठीवर शाबासकीची थाप दिली आहे. महिमा आई जगदंबेचा, डब्बा ऐस पैस, येड्यांची जत्रा, वन टू थ्री फोर, प्रेम संकट, टकाटक, एक नंबर, मनमौजी, दरकोस दर मुक्काम, श्रीगणेशा, फनरल आदींसह अनेक चित्रपटांचा त्यात समावेश आहे. दिग्दर्शक विनोद नाथ, दिग्दर्शक मिलिंद कवडे, दत्ता लोंढे, निमेष राणे, मुकुंद भुजबळ, गणेश यादव आदींसह अनेक मंडळींनी वैभव यांना चांगले सहकार्य केले, पाठींबा दिला. मार्गदर्शन केले. वैभव यांना वेळोवेळी, पावलोपावली मार्गदर्शन करणारे मिलिंद कवडे हे त्यांच्यासाठी गुरुस्थानी आहेत. कास्टिंग डायरेक्टरचे काम करताना अभिनेत्री रुचिता जाधव यांनीही वैभव वाघ यांना वेळोवेळी मदतीचा हात दिला आहे. सहकार्य केले आहे. त्यांच्यासह सारीच मंडळी वैभव यांचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी मानसिक बळ पुरवितात. त्यामुळे हा हरहुन्नरी पडद्याआडील कलाकार धवल यशाचा नक्कीच मैलाचा दगड गाठेल यात शंका नाही.




## निफाड महाविद्यालयातील सतरा विद्यार्थी पोलीस, सैन्यदलात

**नाशिक ।** मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे कर्मवीर गणपत दादा मोरे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय निफाडच्या घटनेत प्रथमच, एकाच वेळी १७ विद्यार्थ्यांची महाराष्ट्र पोलीस व भारतीय सैन्य दलात निवड झाल्याने महाविद्यालयात उत्साही वातावरण तयार झाले आहे. महाविद्यालयातील कनिष्ठ व वरिष्ठ विभागातील एनसीसी कॅडेट्स व क्रीडा विभागातील खेळाडू यांनी मोठ्या प्रमाणात शासकीय सेवेत यशस्वीपणे बाजी मारत नोकरीची संधी मिळवली आहे. यावेळी संस्थेचे सभापती बाळासाहेब क्षीरसागर व महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. (डॉ.) सुरेश जाधव यांच्या हस्ते नोकरीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा स्वागत व सत्कार करण्यात आला. या सर्व विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल मवि प्र समाज संस्थेचे सरचिटणीस अॅड. नितीन ठाकरे, अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले, विश्वासराव मोरे, देवराम मोगल, दिलीप दळवी, शिवाजी आप्पा गडाख, शोभा बोरस्ते, निफाड महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफे.(डॉ.) सुरेश जाधव, सर्व सभासद, हितचिंतक, सर्व प्राध्यापक वृंद, आप्तेष्ट नातेवाईक यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# अंतर्नादने नववर्ष स्वागत सोहळ्याचा शुभारंभ

### गोदतीरी रंगला संगीत-नृत्य-गायनाचा कलाविष्कार

**नाशिक ।** नाशिक महापालिका व नववर्ष स्वागत यात्रा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अंतर्नाद हा भारतीय शास्त्रीय संगीत नृत्य व गायनाचा भव्य कार्यक्रम नाशिक महापालिका आयुक्त मनिषा खत्री, प्रसिद्ध चित्रकार प्रमोद कांबळे व अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाचे कुलसचिव विश्वास जाधव यांच्या उपस्थितीत गोदातीरावर उत्साहात पार पडला.

प्रमुख पाहुण्यांनी कलासक्त तरुण पिढीचे कौतुक केले व अंतर्नाद हा कार्यक्रम नाशिक नगरीचे वैभव आहे, असे गौरवोल्लेख केला. याप्रसंगी अशोका बिल्डकॉनचे अशोक कटारिया हे उपस्थित होते. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्वप्निल माशाळकर यांनी केले आभार प्रदर्शन तृषाली पाठक यांनी केले त्याचबरोबर नेहा देशपांडे यांनी सूत्रसंचालन केले. व्यासपीठावर गुणगौरव न्यासाचे अध्यक्ष प्रफुल्लजी संचेती नववर्ष स्वागत समितीचे अध्यक्ष शिवाजी बोंदार्डे, उपाध्यक्ष चंद्रशेखर जोशी व इतर मान्यवर होते या सांगेतिक कार्यक्रमात नासिक नगरीतील सुमारे ७१ गुरुकुल व त्याचे गुरु सामील होते व सुमारे बाराशे विद्यार्थी कलाकार वादनासाठी उपस्थित होते. सर्व कलाकारांनी अनेक उत्तम उत्तम रचना सादर करून रसिक प्रेक्षकांची मने जिंकली.




# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ उपकेंद्रास दुसरे नाव कशासाठी : देसले

**नाशिक ।** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ नाशिक उपकेंद्रास दिवंगत भाऊसाहेब हिरे व अहील्यानगर उपकेंद्रास पद्ममश्री विखे पाटील पाटील नाव देण्याचा प्रस्ताव पुणे विद्यापीठ अधिसभेत मंजुर झाल्याची बातमी प्रसिद्ध झाली आहे. यामुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ उपकेंद्रास दुसरे नाव कश्यासाठी? हा प्रश्न सध्या निर्माण झालेला आहे. मात्र हे नाव न देता इतर नावांच्या सूचना देखील पूढे येत आहेत.



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ उपकेंद्र नाशिक अथवा अहिल्यानगर उपकेंद्रास इतर कोणाचेही नाव देण्याची आवश्यकता नाही. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ उपकेंद्र समोर गावाचे नाव पुरेसे आहे, असे निवेदन भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सह सचिव कॉ. राजू देसले, नाशिकच्या हुतात्मा स्मारक समितीचे अध्यक्ष विजय राऊत यांनी विद्यापीठास दिले आहे.

ते म्हणाले की, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे विविध ठिकाणी विभागीय कार्यलय आहेत, त्यांना सुद्धा वेगळे नाव दिलेले नाही. महाराष्ट्रात व देशातही कार्यरत विद्यापीठ सुद्धा त्यांच्या उपकेंद्रांना वेगळे नाव देत नाही. त्यामुळे पुणे विद्यापीठाने सुद्धा असा पायंडा पाडू नये. विद्यापीठ अधिसभेने विद्यार्थी शैक्षणिक प्रश्न व गुणवत्ता वाढसाठी काम करावे. सावित्रीबाई फुले शिक्षणासाठी प्रेरणादायी आहेत. खरा इतिहास लोकांपर्यंत कायम रहावा यासाठी सावित्रीबाई फुलेंचे नाव पुणे विद्यापीठास देण्यासाठी प्रचंड आंदोलने झाली होती, हा इतिहास आहे. पुणे विद्यापीठाने याचा विचार करावा व कोणत्याही उपकेंद्रास दुसरे कोणतेही नाव देऊ नये, अशी मागणी 27 मार्च 2025 सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ नाशिक उपकेंद्र, शरणपूर रोड नाशिक रोजी निवेदनाद्वारे करण्यात आली. यावेळी कॉ. राजू देसले, राज्य सह सचिव भारतीय कम्युनिस्ट पक्ष महाराष्ट्र, विजय राऊत अध्यक्ष हुतात्मा स्मारक समिती नाशिक, जयवंत खडतळे, प्रभाकर धात्रक, राजर्षी शाहू महाराज शताब्दी समिती, अजमल खान, संविधान प्रेमी नाशिककर, देवीदास हजारे, छात्रभारती, कैवल्य चंद्रात्रे, तल्हा शेख,ऑल इंडिया स्टूडेंट फेडरेशन, विजय साळुंखे, जगताप सर, सत्यशोधक समाज प्रतिष्ठान, विजय बागुल, कृष्णा शिरसाट, आर पी आय सेक्युलर, तलहा शेख, करुणा सागर पगारे आदींनी केले. नाशिक शहरातील सर्व पुरोगामी, परिवर्तनवादी चळवळीचे कार्यकर्ते संघटनांचे लोक यावेळी उपस्थित होते. याबाबतचे निवेदन सहाय्यक कुलसचिव श्रीपाद बुरकुले व सिनेट सदस्य पुणे विद्यापीठ व्यवस्थापन समितीचे सदस्य सागर वैद्य यांना निवेदन देण्यात आले.

**➤ महत्त्वाचे**

## ओझरला भगवान बाणेश्वर महादेवाची मुकुट मिरवणूक

**ओझर ।** ओझर येथील देवभूमी जनशांती धाम येथे प्रदोष निमित्त देवाधिदेव महादेव अभिषेक पूजन व भगवान बाणेश्वर महादेव मुकुट व पालखी मिरवणूक सोहळा मोठ्या उत्साहातपूर्ण वातावरणात संपन्न झाला. जगदगुरु जनार्दन स्वामी महाराज धर्मपीठाचे पिठाधीश्वर जगदगुरु स्वामी शांतीगिरिजी मौनगिरीजी महाराज यांच्या



संकल्पनेतून ओझर येथे साकारण्यात आलेल्या देवभूमी जनशांती धाम येथे २७५ पेक्षा जास्त देवीदेवतांची स्थापना करण्यात आली आहे. त्यात १३० शिवलिंगाची स्थापना करण्यात आली आहे. त्यामुळे शिवभक्तांसाठी वरदानकारी ठरलेल्या देवभूमी जनशांती धाम येथे प्रदोष उत्सवास मोठ्या उत्साहपूर्ण प्रारंभ करण्यात आला.बजगदगुरु स्वामी शांतीगिरीजी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित या कार्यक्रमाचा प्रारंभ येथील बारा ज्योतिर्लिंग, चारधाम, अष्टमूर्ती शंकर आणि देवता भगवान बाणेश्वर महादेव व जगदगुरु जनार्दन स्वामी महाराज यांच्या अभिषेक पूजनाने करण्यात आला. मुख्य अभिषेकास नंतर श्री हनुमान मंदिर येथून भगवान बाणेश्वर महादेवाचा मुकुट व पालखी मिरवणूक मोठ्या उत्साहात संपन्न झाली. मिरवणुकीत कलशधारी महिला, कुमारिका, धर्मध्वज घेऊन युवक व भाविक सहभागी झाले होते. यावेळी भालचंद्र कासार, रवींद्र चौधरी, हरिश्चंद्र पवार,सुनील मोरे, अरुणशेठ पवार, माधवराव चौरे, मधुकर नवघिरे, सुभाष शेजवळ, डॉ.अशोक लड्ढा, पुंडलिक शिवले, मधुकर शिंदे, ज्ञानेश्वर भालेराव, दौलतराव गायकवाड,पांडुरंग जाधव,गणेश चौधरी, संदीप चौधरी, हेमंत मोहाडकर, ज्ञानेश्वर शेजवळ, भारत नवघिरे,गणपत गोडे, सुभाष भडके,अरुण चौधरी, रामेश्वर शिवले, हृदयानंद माऊली,मोरेश्वर गुरु जोशी, निखिल गुरु जोशी, पिंटू शिंदे, दीपक चौरे, नंदू आंबेकर यांसह ओझर परिसरातील भाविक आश्रम सल्लागार समिती, आश्रम नियोजन समिती सदस्य व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पुणेगाव धरण्याचा डाव्या कालव्यात पडून बालकांचा मृत्यू

**दिंडोरी ।** दिंडोरी तालुक्यातील वणी गावच्या



बोरीपाडा शिवारात असलेल्या पुणेगाव डाव्या कालव्यात शाळकरी विद्यार्थी. कु.रोहन मनोहर पिठे (रा.विश्रामबाग पाडा वणी, वय वर्षे ४) हा बालक इयत्ता 3री ला शिकत होता. बशाळा सुटल्यावर दुपारी बोरीच्या पाडा शिवाराच्या पुणेगाव डाव्या कालव्याला पोहण्यासाठी गेला असता बेपत्ता झाला होता. हे कळल्यावर स्थानिक व पोलीस कर्मचारी यांनी धाव घेऊन त्याचा शोध घेतला असता तीन तासानंतर सापडला. त्यानंतर तातडीने वणी ग्रामीण रुग्णालय दाखल केला असता वैद्यकीय अधीक्षक यांनी डॉ. गायधनी यांनी मृत्यू घोषित केले . वणी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू नोंद करण्यात आली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे याचं प्रच्यात आई वडील २ बहीण असा परिवार होता.

## सातपूरला आज भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन

**नाशिक ।** जिल्हा कौशल्य विकास रोजगार उद्योजकता व नागरिक विभाग विभाग आणि युवाशक्ती फाउंडेशन आणि रवी देवरे यांच्या संयुक्त विद्यमाने सातपूर येथे पपया नर्सरी जवळील सौभाग्य लॉन्स येथे भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती रोजगार मेळाव्याच्या आयोजकांच्यावतीने देण्यात आली आहे. या मेळाव्यात सातपूर, अंबड, सिन्नर, दिंडोरी, इगतपुरी औद्योगिक पट्ट्यातील असंख्य नामवंत कंपन्या सहभाग नोंदवत असून, हजारो तरुणांना या रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून रोजगाराच्या संधी मिळत असल्याचे सांगण्यात आले. या मेळाव्याचे उदघाटन जिल्हा कौशल्य विकास उपायुक्त सुनील सैंदाणे त्यांचे हस्ते होत असून या मेळाव्यास प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा कौशल्य विकास सहाय्यक आयुक्त अनिशा तडवी, अप्रेंटिस ॲडव्हायझर जे जे पाटील, सातपूरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रणजीत नलावडे, निमाचे माजी अध्यक्ष धनंजय बेळे, निमाचे अध्यक्ष आशिष नहार, आयमाचे अध्यक्ष ललित बुब, सिन्नर तालुका औद्योगिक वसाहत अध्यक्ष नामकर्ण आवारे, निपम नाशिक शाखेचे अध्यक्ष राजाराम कासार, निमाचे सरचिटणीस राजेंद्र अहिरे, उपाध्यक्ष मनीष रावल निमा रोजगार निर्मिती समितीचे अध्यक्ष गोविंद बोरसे आदी उपस्थित राहणार आहेत.

# मार्च एन्डच्या नावाखाली १२ कोटींची बोगस बिले लाटण्याचा प्रयत्न

### सिंचन विभागातील पुणेगाव कालवा उपविभाग संशयाच्या भोवऱ्यात

**नाशिक ।** सिंचन विभागात मार्च एण्डच्या नावाखाली अनेक गैरप्रकार होत असल्याचे उघडकीस येत असून, ठेकेदारांना हाताशी धरून अधिकाऱ्यांकडूनच सर्रासपणे बोगस बिले लाटण्याचे प्रकार घडतच आहे.

सिंचन विभागातील पुणेगाव कालवा उपविभागांतर्गत डाव्या कालव्याचे काम पूर्ण न करताच अधिकारी आणि ठेकेदारांनी संगनमत करत तब्बल १२ कोटी रुपयांची बोगस बिले लाटण्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. अधिकाऱ्यांच्या या कुटील कारस्थानाची माहिती बाहेर येतात मुख्य अभियंता मिसाळ यांच्याकडे या संदर्भात लेखी तक्रार करण्यात आली आहे. कुठलीही शहानिशा न करता बिल अदा केल्यास शासनाची मोठी फसवणूक होणार असून, बिल मंजूर झाल्यास थेट मंत्रालयासमोर आंदोलनाचा इशारा तक्रारदाराने दिला आहे.

सध्या मार्च एण्डच्या नावाखाली सिंचन विभागात अधिकारी, कंत्राटदारांची वेगळीच लगबग सुरू आहे. प्रत्येक जण झालेल्या तसेच न झालेल्या कामांची बिले मंजूर करून घेण्यात





व्यस्त असल्याचे दिसून येत आहे. जलसंपदा विभागातील नांदूर मधमेश्वर प्रकल्प उपविभागीय अभियंता, पुणेगाव कालवा उपविभागांतर्गत पुणेगाव डावा कालवा ० ते ६३ कि.मी.चे मातीकाम बांधकाम व अस्तरीकरणाचे काम सुरू आहे. या कामात मोठी अनियमितता व भ्रष्टाचार होत असल्याचा संशय व्यक्त केला जात असून, कालव्याचे कार्यकारी अभियंता, उपविभागीय अभियंता यांनी कंत्राटदाराशी संगनमत करत कालव्याच्या ठिकाणी प्रत्यक्षात कामकाज न करता ३१ मार्चच्या आत तब्बल १२ कोटी रुपयांचे बोगस बिल महामंडळ, संभाजीनगर कार्यालयाकडे सादर केले आहे. या कामाच्या संदर्भात मोठा संशय घेतला जात असून, प्रत्यक्षात जेवढे काम होणे अपेक्षित आहे तेवढे न करता बिले लाटण्याचा प्रयत्न सुरू आहे. झालेल्या कामाच्या मोबदल्यापेक्षाही जास्त रक्कम अदा केली जात असल्याचा आरोप केला जात आहे. ठेकेदाराने कुठलेही काम पूर्ण केल्यावर त्याची संबंधित यंत्रणेकडून प्रत्यक्षात पडताळणी केल्यानंतर त्याची बिले अदा करायची, असा शासनाचा नियम असताना या कामासंदर्भात कुठलीही शहानिशा न करता उपविभागीय अभियंता, शाखा अभियंता तसेच कार्यकारी अभियंता व लेखा शाखेतील एका कर्मचाऱ्याने बिल अदा करण्याचा घाट घातला आहे. अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर संशय व्यक्त केला जात असून ठेकेदाराला बिल अदा करण्यासाठी एवढी घाई कशासाठी? असा सवाल उपस्थित केला जात आहे. या बोगस कामाचे बिलही अतितातडीने तयार करून महामंडळाला सादर केले आहे. या कामा संदर्भात कार्यालयाकडून कमालीची गोपनीयता पाळली जात असून, या कामाच्या संदर्भात कुठलीही माहिती उघड केली जात नाही. त्यामुळे हा गंभीर प्रकार असून याबाबत वरिष्ठ पातळीवर चौकशी करण्याची मागणी तक्रारदाराने केली आहे. ज्या पद्धतीने बिले अदा करण्याचा घाट अधिकाऱ्यांकडून घातला गेला आहे. त्या प्रमाणात कामे झालीच नसून वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रत्यक्षात घटनास्थळी पाहणी केल्यानंतर वस्तुस्थिती उघडकीस येणार आहे. त्यामुळे काम न करता तब्बल १२ कोटींचे बिल लाटण्याचे मोठे षडयंत्र असून, बोगस बिले सादर करत एक प्रकारे शासनाच्या तिजोरीवर दरोडा घालण्याचा प्रकार आहे. मार्च एण्डच्या नावाखाली सिंचन विभागात काय उद्योग चालतात हे सर्वश्रुत आहे; परंतु अशा प्रकारांना आळा घालण्याची मागणी सर्वसामान्यांकडून केली जात आहे. खोटी बिले सादर करण्याचे एक प्रकरण उघडकीस आले असून, असे किती प्रकार सिंचन विभागात सुरू आहेत याबाबत उलट सुलट चर्चा होत आहे.

## सेवनिवृत्तांना महापालिकेकडून निरोप

**नाशिक ।** मनपात विविध संवर्गातील व विभागातील अधिकारी व कर्मचारी वयोमानाने माहे मार्च २०२५ मध्ये सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्ताने सदर सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी यांचा सेवापूर्ती सत्कारचा कार्यक्रम मनपा मुख्यालय येथे शुक्रवारी सायंकाळी ५.३० वाजता पार पडला.

मनपाचे आयुक्त तथा प्रशासक यांच्यावतीने उपआयुक्त (कर) अजित निकत यांच्या हस्ते उपअभियंता मोहंमद एजाज काझी, वरीष्ठ लिपिक महेंद्र परदेशी, कनिष्ठ लिपिक सुनील खरे, वाहनचालक विजयानंद स्वामी, बिगारी श्रावण शिराळ, लेखराज चव्हान, रवींद्र जगताप, प्रवीण पवार, छाया पाटील, हेमंत मोरे, सिंधुताई इप्पर, स.कामगार बशिरखान पठाण, मुदलीधर लांडे व इतर स्वेच्छानिवृत्त अधिकारी/कर्मचाऱ्यांचा स्मृतीचिन्ह, शाल श्रीफळ, वृक्षरोप देऊन सेवापूर्ती सत्कार करण्यात आला. सेवानिवृत्त कर्मचारी यांना सेवापूर्ती निरोप देण्यासाठी मनपाचे उपआयुक्त अजीत निकत, जनसंपर्क अधिकारी योगेश कमोद, विभागीय अधिकारी मदन हरिश्चंद्र, राजाराम जाधव, योगेश अडभाई, गोकुळ आवारे आदींसह नितीन बागुल, इफ्तेखार शेख, विरु कामे, साहिल बोडके आदी उपस्थित होते.





## जलसंपदा मंत्री महाजन यांनी केली त्र्यंबकेश्वरची पाहणी



### लगबग आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याची...

**नाशिक ।** आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर राज्याचे जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांनी शुक्रवारी त्र्यंबकेश्वर परिसराची पाहणी केली.

यावेळी विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी जलज शर्मा, प.पू. हरीगिरीजी महाराज, रवी पुजारी महाराज आदी उपस्थित होते. महाजन यांनी गोदावरी नदी, गोदावरील नदीवरील घाट, नील पर्वत, बिल्व तीर्थसह विविध परिसराची पाहणी केली. तसेच राज्य शासनाच्या माध्यमातून कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या विविध उपाययोजनांची सविस्तर माहिती दिली. आगामी कुंभमेळ्यापूर्वी सर्व विकास कामांची पूर्तता केली जाईल. त्र्यंबकेश्वर येथे येणाऱ्या साधू, महतांना आवश्यक सोयीसुविधांची पूर्तता केली जाईल. तशा सूचना जिल्हा प्रशासनाला देण्यात आल्या आहेत, असेही त्यांनी सांगितले.

## महात्मा फुले, डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या दुरुस्तीसह सुशोभिकरण करावे

### महात्मा फुले जयंती उत्सव समितीचे आयुक्तांना निवेदन

नाशिक । क्रांतिसूर्य महात्मा जोतिराव फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नाशिक शहरातील सर्व पुतळ्याची साफसफाई, रंगरंगोटी, दुरुस्ती व सुशोभिकरण करण्याची मागणी महात्मा जोतीराव फुले जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष अंबादास खैरे, कार्यकारिणी अध्यक्ष शशी हिरवे, महिला अध्यक्ष तेजश्री काठे, कार्याध्यक्ष संदिप गांगुर्डे, महिला कार्याध्यक्ष आशा भंदुरे यांनी महापालिका आयुक्त मनीषा खत्री यांना निवेदनाद्वारे केली.



महात्मा फुले यांची दि. ११ एप्रिल रोजी तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची दि. १४ एप्रिल रोजी जयंती आहे. यानिमित्त समाजातील विविध क्षेत्रातील प्रमुख मान्यवर शहरातील विविध ठिकाणी असलेल्या पुतळ्यावर जाऊन अभिवादन करत असतात. शहरातील जवळपास सर्वच पुतळ्यांची अवस्था दयनिय झालेली असल्याने महात्मा जोतीराव फुले जयंती उत्सव समितीने सर्व पुतळ्यांची साफसफाई, रंगरंगोटी, दुरुस्ती व सुशोभिकरण मागील काळात केली होती; परंतु नाशिक महापालिकेने देखील महापुरुषांच्या जयंती व पुण्यतिथीच्या दिवशी विशेषतः पंचवटी विभागातील गणेश वाडी या परिसरात डॉ. आंबेडकर यांच्या हस्ते उदघाटन झालेला मारुती मंदिर येथील अर्धाकृती पुतळा, गणेश वाडी मनपा शाळा येथील पूर्णाकृती पुतळा, नाशिक पुर्व विभागातील महालक्ष्मी चाळ येथील पुतळा व दूध बाजार, जुने नाशिक येथील महात्मा फुले मंडई येथील पुतळ्यांची साफसफाई करून सर्व प्रकारची रंगरंगोटी, दुरस्ती व पुतळ्याभोवती सुशोभिकरण करावे, अशी मागणी यात करण्यात आली आहे.

यावेळी शंतनू शिंदे, शरद मंडलिक, शंकर मोकळ, प्रमोद बनकर, संदीप बनकर, विवेक सोनवणे, भास्कर जेजूरकर, किशोर भास्कर, तुषार विधाते, कुलदीप जेजूरकर, मुक्तेश्वर जाधव, अशोक जाधव आदींसह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# भूमिका मनापासून स्वीकारून सादरीकरण करायला हवे : जेष्ठ रंगकर्मी जाधव

### पिंडकौल नाटक ग्रुपतर्फे जागतिक रंगभूमी दिन साजरा

**नाशिक ।** कलाकाराने स्वतःला शिस्त लावायला हवी. आपली भूमिका काय आहे याचे आत्मचिंतन करावे. भूमिका छोटी की मोठी याचा विचार न करता आपण ती भुमिका मनापासून स्वीकारून जबाबदारीने सादरीकरण करायला हवे, असे प्रतिपादन जेष्ठ रंगकर्मी राजेश जाधव यांनी केले.

नाशिक जिल्हा अहिर सुवर्णकार समाज, हरिओम सांस्कृतिक संस्था, नासिक व पिंडकौल नाटक ग्रुपच्यावतीने नेहरू चौकातील सोनार वाडा येथे गुरुवारी (दि.२७) जागतिक रंगभूमी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. त्यावेळी जाधव बोलत होते. व्यासपीठावर यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अभिनेत्री तथा नीफ फेस्टिव्हल नाशिकच्या संचालक प्रियदर्शनी कनेरी, "दर कोस दर मुक्काम" चित्रपटाचे दिग्दर्शक मुकुंद भुजबळ, लेखक तथा अभिनेता शामदत्त विभांडिक, जेष्ठ रंगकर्मी राजेश जाधव, राजा पाटेकर, विनोद राठोड तसेच हरिओम संस्थेचे अध्यक्ष प्रकाश थोरात, सचिव मनोज जानोरकर, सोनार वाड्याचे पदाधिकारी सचिन वडनेरे, बापू ओझरकर व नाट्य कलावंत योगेश्वर थोरात आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी जुन्या-नव्या कलाकारांचा सन्मानपत्र व गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी मनोगत



व्यक्त करताना प्रियदर्शनी कनेरी यांनी कलाकारांना शुभेच्छा देताना सांगितले की नाटकासोबतच विविध कलेच्या माध्यमातून नाशिक फेस्टिवलमध्ये आवर्जून सहभाग घेऊन आपली कला सादर करता येते. तेव्हा जास्तीत जास्त कलाकारांनी या आपल्या नाशिक इंटरनॅशनल फिल्म फेस्टीवलमध्ये सहभागी व्हावे, असे सांगितले. नाटककाराने नवीन विषय आजच्या तरुण व बाल पिढीला मार्गदर्शक ठरतील असे नाटक लेखकाने लिहायला हवे. ते नाटक मनोरंजना-बरोबर दिशादर्शक ठरायला हवे, असे मुकुंद भुजबळ यांनी सांगितले. केले. राजेश जाधव मार्गदर्शन करताना म्हणाले, कलाकाराने स्वतःला शिस्त लावायला हवी.



दिलेल्या वेळेत पोहचून आपली भूमिका काय आहे, याचे आत्मचिंतन करावे. आपला आवाज, आपल्यावर येणारे लाईट्स, आपण कसं सादरीकरण करु यावर लक्ष केंद्रीत करावे, भूमिका छोटी की मोठी याचा विचार न करता आपण ती भूमिका मनापासून स्वीकार करून जबाबदारीने सादरीकरण केले पाहिजे. यावेळी विनोद राठोड यांनी सांगितले की कलाकाराने नेहमी नाटकाच्या तालमीत सातत्याने नवनवीन प्रयोग करत रहायला हवे. कलाकारांनी फक्त अभिनय न करता नाटकाच्या तांत्रिक बाबी लाईट, सांऊड, नेपथ्य, डिझाईन, रंगभुषा, वेशभूषा अशा सर्व बाजू शिकायला हव्या, असे मत नाट्य कलावंत योगेश्वर थोरात यांनी व्यक्त केले. जागतिक रंगभूमी दिनाचे महत्त्व काय व का साजरा करावा याच्या बद्दलची माहिती नाट्य अभिनेत्री निशा चव्हाण यांनी दिली. यावेळी उपस्थित सर्व जेष्ठ रंगकर्मी उल्हास वानखेडे, जयप्रकाश पुरोहित, कविता होले, नीलेश अहिरराव, डॉ.जानकी नाईक, पूजा भावसार, पुनम वानखेडे, रेखा देशपांडे, सचिता काळे, अमोल अहिरराव आदींचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानपत्र व गुलाब पुष्प देऊन सन्मान करण्यात आला.बकार्यक्रमाचे सूत्रसंचालन कीर्ती नागरे यांनी केले. मयुर बोराडे यांनी आभारप्रदर्शन केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी संदीप आजगे, संदीप पवार, श्लोक अल्हाट, शरद पवार,पंकज माळवाल, दीक्षांत मोरे, निलीमा मोरे, अश्विनी साळवे यांनी परिश्रम घेतले.

# प्रकाशित व्हावेत समृध्दीचे सारे राजमार्ग!

गुढीपाडवा हा एक भारतीय सण असून मराठी आणि कोकणी हिंदूंसाठी चंद्र सौर नववर्षाची सुरुवात करणारा वसंतोत्सव आहे. हिंदू दिनदर्शिकेप्रमाणे चंद्रसौर हिंदू कॅलेंडरच्या पहिल्या महिन्याच्या चैत्राच्या सुरुवातीला हा दिवस महाराष्ट्र, गोवा आणि दमणच्या आसपास साजरा केला जातो. शालीवाहन संवत्सराचा हा पहिला दिवस आहे.

वेदांग ज्योतिष या ग्रंथात सांगितलेल्या साडेतीन मुहुर्तांपैकी हा एक मुहूर्त आहे. या दिवशी नवीन वस्तू खरेदी, व्यवसाय प्रारंभ, नव उपक्रमांचा प्रारंभ, सुवर्ण खरेदी इत्यादी गोष्टी केल्या जातात. दारी उभारलेली गुढी हे विजय आणि समृद्धीचे प्रतीक आहे असे मानले जाते.

गुढीपाडव्याच्या निमित्ताने हिंदू संस्कृतीची झलक दाखविणाऱ्या मिरवणुका काढल्या जातात. महिला, पुरुष, लहान मुले पारंपरिक पोशाखांत या मिरवणुकीत सहभागी होतात.

या दिवशी पाणपोई घालावी, पाण्याने भरलेल्या घड्याचे दान करावे असाही संकेत रूढ आहे. या मंगलदिनी विविध ठिकाणी पहाटेच्या सांस्कृतिक मैफिली उत्साहाने आयोजित केल्या जातात. रसिकांचा वाढता प्रतिसाद दिवाळी पहाट, नववर्ष पहाट व गुढीपाडवा किंवा हिंदू नववर्ष पहाट या उपक्रमाला मिळत आहे.

चैत्र शुद्ध प्रतिपदेला लवकर उठतात, स्नान करतात, स्नान इ.दैनंदिन कर्मे झाल्यावर सूर्योदयानंतर ही गुढी उभारतात. या दिवशी महाराष्ट्रात लोक घराच्या प्रवेशद्वारी उंचावर गुढी उभारतात. उंच बांबूच्या काडीला कडूनिंबाची डहाळी, काढीच्या वरच्या टोकाला रेशमी वस्त्र अथवा साडी गुंडाळतात, फुलांचा हार आणि साखरेची गाठी बांधून त्यावर तांब्या/धातूचे भांडे बसवले जाते, गुढीचा बांबू पाटावर उभा केला जातो, तयार केलेली गुढी दारात, उंच गच्चीवर लावतात. गुढीला गंध, फुले, अक्षता वाहतात व निरांजन लावून उदबत्ती दाखवतात. दुपारी गोडाचा नैवेद्य दाखवून संध्याकाळी पुन्हा हळद-कुंकू फुले वाहून गुढी उतरवली जाते.



यादिवशी आनंद साजरा करीत आप्तेष्टांना नववर्षाच्या शुभेच्छा, गुढीपाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या जातात. चैत्र शुध्द प्रतिपदा हा दिवस कर्नाटक आणि आंध्रप्रदेश अशा गौतमीपुत्राची सत्ता असलेल्या राज्यांत स्वातंत्र्य प्राप्तीचा आनंद झाल्यामुळे विजयदिन म्हणून संवत्सर पाडवो वा उगादी अशा वेगवेगळ्या नावांनी व वेगवेगळ्या पद्धतीने साजरा करण्यात येतो. प्रामुख्याने महाराष्ट्रात या सणाला गुढीपाडवा असे संबोधले जाते. सिंधी लोक चेटीचंड नावाने या उत्सवाला संबोधतात.

वर्षप्रतिपदेच्या दिवशी विघ्नहर्त्या गणपतीचे, देवादिकांचे स्मरण, पूजन करतात. गुरू, वडीलधाऱ्यांना वंदन करावे, अशीही रूढी आहे. त्यानंतर संवत्सर फल श्रवण करावे, असा संकेत रूढ आहे.

संवत्सर फल म्हणजे काय? तर त्या पाडव्यापासून जे संवत्सर म्हणजे वर्ष सुरू होत असते, त्या वर्षाच्या पहिल्या दिवशी आणि नंतरच्या काही विशिष्ट दिवशी असणारी स्थिती - जसे वार, चंद्र, नक्षत्र, सूर्याचे विविध नक्षत्रप्रवेश इत्यादी संदर्भावरून हे संवत्सर फल दिलेले असते. संवत्सर फलात देशकालाचाही निर्देश असतो, म्हणजे देशाच्या कोणत्या भागात सुखसमृद्धी असेल ते संवत्सर फलात त्रोटकपणे सांगितलेले असते.

वर्षप्रतिपदेच्या म्हणजे गुढीपाडव्याच्या दिवशी जो वार असेल त्या वाराचा जो ग्रह असेल तो त्या संवत्सराचा अधिपती असे मानले जाते. म्हणजे आजपासून सुरू होणारे वर्ष हे जर मंगळवारी सुरू होत असेल तर मंगळ हा त्या वर्षाचा अधिपती असे समजले जाते.

साठ संवत्सरांची वेगवेगळ्या पद्धतीने विभागणी केली आहे. एका विभागणीत पाच संवत्सरांचे एक युग अशा पद्धतीने साठ संवत्सरांची बारा युगे मानली जातात. तसेच संवत्सर चक्रातील ८ व्या भाव नावाच्या संवत्सरापासून विजय या २७ व्या संवत्सरापर्यंत २० संवत्सरांचा स्वामी पालनकर्ता विष्णू आहे असे मानले जाते.



प्रविण बागडे
नागपूर. 9923620919
pravinbagde@gmail.com

ब्रह्मदेवाने पहिली तिथी सर्वात श्रेष्ठ म्हणून घोषित केली. तिला पहिले पद मिळाल्याने ती प्रतिपदा म्हणून ओळखली जाते असे मानले जाते. या तिथीला युगादी तिथी असेही म्हणतात.

तेलगु भाषेत गुढी या शब्दाचा अर्थ लाकूड अथवा काठी असा आहे तसाच तो तोरण असाही आहे. दाते, कर्वे लिखित महाराष्ट्र शब्दकोशाचा आधार घेतला तर गुढ्या या शब्दाचा अभिप्रेत अर्थ त्या शब्दकोशाने खोपटी, झोपडी, अथवा पाल असा दिला आहे.

हिंदीत कुडी या शब्दाचा एक अर्थ लाकूड उभे करून उभारलेली कुटी अथवा झोपडी असा होतो. राहण्याची जागा या अर्थाने गुडी हा शब्द येऊन दक्षिणेतली आंध्र, कर्नाटक, तामिळनाडू खासकरून आंध्रातील गावांच्या नावांची संख्या अभ्यासली असता लाकूड या अर्थाने तेलगूतील गुढी या शब्दाचा अधिक वापर आणि जुन्या मराठीतील लाकूड बांबू/काठी ने बनवलेले घर, हे पाहता हा शब्द महाराष्ट्र आणि आंध्र या प्रदेशात गुढी शब्दाचा प्रचार अधिक असावा.

शालिवाहनपूर्व काळात कदाचित गुढीचा लाकूड बांबू/काठी हा अर्थ महाराष्ट्रीयांच्या शब्द संग्रहातून मागे पडला असावा पण आंध्रशी घनिष्ट संबंध असलेल्या शालिवाहन राजघराण्याच्या लाकूड बांबू/काठी या अर्थाने तो वापरात राहिला असण्याची शक्यता असू शकते.

चैत्र हा अधिकमास असता, काहींच्या मते अधिकमासाच्या शुद्ध प्रतिपदेस वर्षारंभाची धार्मिक कृत्ये करावीत; तर काहींच्या मते ती शुद्ध किंवा निज चैत्राच्या प्रतिपदेस करावी, असा मतभेद आहे.

याविषयी धर्मसिंधूने निर्णय दिला आहे तो असा - अभ्यंगस्नानादी कृत्ये अधिक मासाच्या शुद्ध प्रतिपदेसच करावी; पण गुढी उभारणे, कडुलिंबाची पाने खाणे, पंचांग श्रवण करणे या गोष्टी शुद्ध चैत्राच्या प्रतिपदेस कराव्या. चैत्र शुद्ध प्रतिपदेला प्रातःकाळी ओवा, मीठ, हिंग, मिरी आणि साखर कडुनिंबाच्या पानांबरोबर वाटून खातात.

पचनक्रिया सुधारणे, पित्तनाश करणे, त्वचा रोग बरे करणे, धान्यातील कीड थांबवणे हे आणि असे अनेक औषधी गुण ह्या कडुनिंबाच्या अंगी आहेत असे आयुर्वेदात मानले जाते. शरीराला थंडावा देणाऱ्या कडूनिंबाची पाने अंघोळीच्या पाण्यात घालणे, ती वाटून खाणे हे आरोग्याच्या दृष्टीने हितकारक समजले जाते.

मध्ययुगात हा उत्सव राजा अथवा त्याच्या अधिकाऱ्याकडून साजरा केला जात असे. सात गावांचा अधिपती असलेली व्यक्तीही हा उत्सव संपन्न करीत असे. आता घरोघरी हा उत्सव साजरा होतो. सर्वांना गुढीपाडवा व नूतन वर्षाच्या मंगलमय शुभेच्छा !

■ ■ ■

# गुढीपाडवा
## शास्त्रशुद्ध परंपरा आणि अपप्रचार



हिंदु नववर्षारंभ म्हणजेच गुढीपाडवा, हा सण आपण चैत्र शुक्ल प्रतिपदेला साजरा करतो. ब्रह्मदेवाने सृष्टी निर्माण केली, म्हणजे सत्ययुगाला सुरुवात झाली, तो हा दिवस असल्याने या दिवशी वर्षारंभ केला जातो. गुढीपाडव्याला सुरू होणारे नवीन वर्षाचे कालचक्र हे विश्वाच्या उत्पत्तीकाळाशी निगडित असल्याने सृष्टी नवचेतनेने भारित झालेली असते. गुढीपाडव्याच्या दिवशी सूर्योदयानंतर लगेचच मांगल्याचे, समृद्धीचे प्रतीक असलेल्या गुढीचे पूजन करून गुढी उभारावी, असे शास्त्रात सांगितले आहे. मात्र, आज फेसबूक, व्हॉट्स ॲप यांसारख्या सामाजिक संकेत स्थळांवरून गुढीपाडव्याविषयी अपप्रचार केला जात आहे.

**अपसमज १ :** शुभ समजला जाणारा कलश गुढीपाडव्याच्या दिवशी उलटा का लावतात?

खंडन : गुढीवर उलटा घालण्यात आलेल्या कलशाच्या काही प्रमाणात निमुळत्या झालेल्या भागातून तो ब्रह्मांडमंडलातून प्रजापति-लहरी आकृष्ट करून घेतो. या लहरी कलशात सामावून रहातात. कलश उलट घातल्यामुळे ती स्पंदने भूमंडलाकडे आणि पूजकाकडे प्रक्षेपित होतात. देवळातील कळस हा सुद्धा याचप्रमाणे वरच्या दिशेने पूर्णपणे निमुळता असतो आणि तो लहरी आकृष्ट करतो.

**अपसमज २ :** ब्राह्मणांनीच शंभूराजांची हत्या करून गुढी उभारायला प्रारंभ केला!

खंडन : वर्ष १६८९ मध्ये औरंगजेबाने छत्रपती संभाजी महाराजांचे हालहाल करून अखेर फाल्गुन अमावास्येच्या दिवशी मारले. दुसऱ्या दिवशी चैत्र शुक्ल पक्ष प्रतिपदा, म्हणजेच गुढीपाडवा हा हिंदूंचा नववर्षदिन होता. हिंदूंनी तो साजरा करू नये, असा औरंगजेबाचा त्यामागे हेतू होता.

वस्तूतः हत्येचा गुढीपाडव्याच्या दिवशी उभारल्या जाणाऱ्या गुढीशी काहीच संबंध नाही. औरंगजेबाने छत्रपती संभाजी महाराजांना हालहाल करून मारले, हा सूर्यप्रकाशाइतका स्वच्छ इतिहास आहे. अनेक ठिकाणी तो संदर्भांसह उपलब्धही आहे. आजपर्यंत एकाही इतिहासकाराने छत्रपती संभाजी महाराजांना ब्राह्मणांनी मारले, असे म्हटलेले नाही. असे असतांना क्रूरकर्मा औरंगजेबाचे पाप झाकण्याचा प्रयत्न का होत आहे? याचा विचार हिंदूंनी करायला हवा.

गुढीपाडव्याविषयी जातीद्वेषमूलक प्रसाराला बळी पडू नये. हिंदू संस्कृतीनुसार प्रत्येक हिंदूंनी गुढीपाडवा साजरा करून धर्माचरणाचे पालन करावे. प्रभु श्रीराम वनवास संपवून अयोध्येत परतले, तेव्हापासून गुढ्या उभारणे, तोरणे लावणे, ही परंपरा आहे.

सृष्टीच्या निर्मितीचा दिवस म्हणूनही गुढीपाडव्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. ब्रह्मदेवाने याच दिवशी सृष्टी निर्माण केल्याचे मानले जाते. म्हणजेच खरे तर हा दिवस केवळ हिंदूंचाच नसून अखिल विश्वातील मानवजातीचा आहे.

**अपसमज ३ :** गुढीपूजनाच्या वेळी पालथा गडू आणि लुगडे यांचा वापर म्हणजे अशुभ समजणे.

गुढीपूजनाच्या वेळी पालथा गडू आणि लुगडे यांचा वापर करून उभारलेली गुढी ही विटंबना आहे. गुढी उभारताना पालथा गडू, लुगडे यांचा वापर न करता भगवा ध्वज उभारून मंगल कलशाची पूजा करावी. अशा प्रकारचे आवाहन सध्या सामाजिक माध्यमांवर सर्वत्र प्रसारित होत आहे. अशा आवाहनांमुळे हिंदूंमध्ये संभ्रम निर्माण होऊन ते धर्माचरणापासून वंचित राहतात ! तेव्हा शास्त्रानुसार गुढीपूजन कसे करावे, याची शास्त्रशुद्ध माहिती असणे आवश्यक आहे.

आपण ज्याला गुढी म्हणतो, त्याचे प्राचीन नाव ब्रह्मध्वज आहे. त्यामुळे ब्रह्मध्वजाचे पूजन असे म्हटले पाहिजे. गुढी हा शब्द संस्कृत नाही, तर पाडवाह्न प्रतिपदेचा अपभ्रंश आहे. ब्रह्मध्वजपूजनाविषयीची माहिती ' धर्मसिंधु ' या ग्रंथात सुद्धा उपलब्ध आहे. हिंदूंसाठी चैत्र मासापासून वर्षारंभ असून त्याला दक्षिण भारतात उगादी असेही म्हणतात.

सृष्टीचा निर्माता ब्रह्मदेव असून त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी या दिवशी ब्रह्मध्वजपूजन करतात आणि तेव्हापासून रामनवरात्र देखील सुरू होते. ब्रह्मध्वजाला हिरवी साडी किंवा निळे कापड अथवा भगव्या वणाची साडी, भगवे वस्त्र नेसवतात आणि हे परंपरेला धरून आहे. पूर्वी सुवर्ण किंवा चांदीचे पात्र हे गुढीवर पालथे घातले जाई. पूर्वी देवघरातील देवतांची पात्रे ही चांदीविना इतर कोणत्याही धातूची नव्हती. ही जुनी परंपरा लुप्त होत आहे. कालातरांने चोऱ्या वाढल्या म्हणून चांदीचे भांडे ठेवणे बंद झाले. त्यामुळे सध्या तांब्याचे भांडे वापरले जाते.

खरेतर सुवर्ण, चांदी आणि कांस्य यांचा वापर गुढी उभारतांना व्हायला हवा; पण ते शक्य नसल्याने तांबे वापरले जाते. स्टील किंवा प्लास्टिक यांचा वापर पूजनामध्ये करता कामा नये. या दिवशी ब्रम्हांडात प्रजापती लहरी सर्वाधिक कार्यरत असतात.

गुढीवर भांडे पालथे ठेवल्याने त्याद्वारे ब्रम्हांडातील प्रजापती लहरी अधिकाधिक ग्रहण करता येतात. मुळात कलश पालथा ठेवणे, हे अशुभ असते, हे कोणी ठरवले? पूर्वीच्या काळी एखादी व्यक्ती बाहेर गेली आणि तिला येण्यास विलंब झाल्यास उंबऱ्यावर पालथा घडा ठेवून तिची वाट बघितली जात असे. याचा अर्थ चांगल्याची वाट बघणे. गुढीवर पालथा कलश ठेवणे म्हणजे नववर्षादिनापासून हिंदू चांगल्या दिवसांची वाट पहातात, असाही आहे.

गुढीपाडवा हा हिंदूंच्या अद्वितीय कालगणनेचे प्रतीक आहे. तो जीवनातील शुभारंभाचे प्रतीक आहे. त्यामुळे कोणत्याही अपप्रचाराला बळी न पडता, धर्मशास्त्रानुसार गुढीपाडवा पारंपरिक पद्धतीने साजरा करायला हवा. तेव्हाच खऱ्या अर्थाने सण आणि उत्सव यांमध्ये पावित्र्य राहणार आहे. त्याचा व्यक्तिगत जीवनात आणि सामाजिक दृष्टीनेही सकारात्मकता वाढण्यास मदत होणार आहे.

---------------

संदर्भ : दैनिक सनातन प्रभात
संकलक : सौ. अंजली पाध्ये
९९७५५३६९०६

■ ■ ■

# व्यवस्थेच्या विकृतीवर घणाघात करणारी झुंझार कविता : बा स्वातंत्र्या!

शंकर घोरसे हे कामगार कवी, कलावंत जिंदादिल व्यक्तीमत्त्वाचे उपक्रमशील धनी आहेत. त्यांचा 'बा स्वातंत्र्या' हा पहिलाच कवितासंग्रह त्यांच्या चिंतनक्षमतेची वैचारिक प्रगल्भता लक्षात आणून देतो. या संग्रहात त्यांच्या बहुआयामी प्रतिभेने अनेक विषयांना स्पर्श करीत, काव्य रसिकांना एक दमदार नजराणा बहाल केला आहे.

'बा स्वातंत्र्या' या पहिल्याच स्फोटक कवितेत ते सामान्यांच्या मनात खदखदणाऱ्या प्रश्नांना उद्गार देतात. गरिबी, भ्रष्टाचार, जातीवाद, कुपोषण, कुपोषणाची सवय झालेली जनता, स्वातंत्र्याचा गजर करायला बाध्यच आहे : हे त्यांनी प्रखर उपरोधिक शैलीत पटवून दिले आहे. 'विकास आणि प्रगती' या कवितेत त्यांनी सत्तेतल्या सुभेदारांना लाजवून सोडलं आहे.

शंकर घोरसे हे लेखणीत वास्तवाचा विस्तव घेऊन कविता लिहिणारे सूर्यकुलातले बंडखोर कवी आहेत. ते प्रांजल आहेत म्हणूनच हुंडा घेणाऱ्या देणाऱ्यांचा, खादीतल्या खादाडांचा, लबाड चाकरमान्यांचा, अंधश्रद्धा पोसणाऱ्यांचा, संवेदनाहीन पुढाऱ्यांचा (जोडे मारून उद्धार करा असं न म्हणता) उपरोधाने सत्कार घ्या म्हणतात. निर्भय, नितीवान कवीच असं धाडस करू शकतो! कवीने सत्ताधाऱ्यांची विदर्भावरची अवकृपा सडेतोड शब्दात अधोरेखित केलीय.

नागपूर जिल्ह्यातील मोवाड हे कवी शंकर घोरसे यांचे जन्मगांव. ते वर्धा नदीच्या महापुरात पार बेचिराख झालं. त्या गावाची व तिथल्या शाळेची वेदनादायक आठवण या संवेदनशील कवीने अंतःकरणात सुरक्षित ठेवलीय. देवशरणेत गुंतल्यावर शेंदूर फासलेल्या दगडाला देवच म्हणावे लागते.

कवी म्हणतो -

*दगड पायरीचा.. किंवा मंदिराचा*
*शेवटी दगडच असतो....*

नीतिवान माणूस निर्भीड असतो. तो सत्य सांगायला कचरत नाही. नीती नसलेल्या लोकांनी कायदा तयार केला तर न्याय पदरी पडत नाही. हे मोठे भाष्य कवीने कायद्यावर केलंय.

महात्मा फुले, सावित्रीमाई फुले इत्यादी महापुरुषांच्या तेजस्वी विचारांवर कवीचा ठाम विश्वास आहे. म्हणून त्याचा तळहाताच्या रेषा पाहून भविष्य सांगणाऱ्या भंपक बनवाबनवीवर विश्वास नाही.


निसर्गातील ऊर्जा कधीतरी संपेल म्हणून या चिंतनधर्मी कवीने ऊर्जेचे संवर्धन करण्याचे आवाहन केले आहे. झाडं लावायचं आवाहन करीत कवीचा निसर्गाकडे सर्वांसाठी शुद्ध पाणी, शुद्ध हवा मागायचा यत्न स्तुत्य आहे.

*वैश्विक तापमानाचा*
*जाणवतो आहे कहर*
*बदलत चालले ऋतू*
*सूर्य ओकतोय जहर..*

या ओळी कवीच्या चिंतन क्षमतेचे प्रमाण आहे.

कवी शंकर घोरसे स्वतंत्रपणे स्वतःच्या शब्दांत आपला अनुभव अक्षरबद्ध करतात. ते महागाईवर प्रहार करतात. ऐतिहासिक भिडेच्या वाड्यावर, जीर्ण अवशेषावर आसूड उगारतात. अन्नदात्यांच्या मरणकळा पाहून गाढ निद्रेत झोपलेल्या सत्ताधाऱ्यांना नागवं करतात. त्याचवेळी कोरडी कविता न लिहिता रक्तदान, अन्नदान, नेत्रदान, ज्ञानदान, श्रमदान, न्यायदान करत देहदान करायची प्रतिज्ञाही करतात.






हे करत असतांना तिजोरीचं धरण, दातृत्वाचा पाऊस, इच्छाशक्तीचे कालवे अश्या नव्या प्रतिमांचं अन्वेषण करतात. म्हणून मी या जिगरबाज कवीला वैदर्भीय मातीचा सन्मान वाढवणारा कवी म्हणतो. ते केवळ कवी, कलावंत नाहीत अक्षरक्रांती संस्थेच्या माध्यमातून अनेक प्रतिभांना वाव देऊन समोर आणणारे सांस्कृतिक संयोजकही आहेत. याचे मला भूषण वाटते.

कवी शंकर घोरसे म्हणतात,

*तुला म्हणून सांगतो...!*
*मी कवी नाही फारसा*
*कविताच माझा आरसा*

कवितेत खूप मोठी क्षमता अस्ते. कविता कसं वागायचं, कसं जगायचं हेही शिकवते. कवी शंकर घोरसे मी कवी नाही फारसा म्हणत असले तरीही ते अस्सल कवी आहेत. सामाजिक भान, माणसांच्या वेदना जपणारी कविताच खरी कविता असते. या कवीने संस्कृतीच्या नावावर चाललेल्या बेछूट विकृतीचे विच्छेदन केले आहे.

कर्णकर्कश डीजेवाल्यांच्या, अंगविक्षेपपटुंच्या डोळ्यात झणझणीत अंजन घातले आहे ! म्हणूनच कवीला समाजाचा, वर्तमानाचा डोळस भाष्यकार असं म्हटलं जाते.

महिलांना समजावतांना कवी आपुलकीने म्हणतो,

*माहेरचा उंबराठा*
*ओलांडून*
*सासरचा धागा*
*जोडायचा असतो*
*आणि दुःखाच्या*
*डोंगरावरून*
*सुखाची हिरवळ*
*पहायची असते !*

कवीच्या स्पंदनशील मनात अनेक प्रश्न निर्माण होतात. सावित्री नावाची ज्योत जळता-जळता विझून गेली. तरी स्त्रीवरचे अत्याचार का संपत नाही? समता का निर्माण होत नाही? न्यायाला अन्यायच का मिळतो? स्वातंत्र्याचे वैरी रस्तोरस्ती का दिसतात? या प्रखर संवेदनशील कवीच्या मनातील प्रश्नांची मालिका संपत नाही.

*स्वार्थाने बरबटलेल्या*
*सुशिक्षित गिधाडांनी*
*आजवर किती वाती विझविल्या*
*असतील त्या गर्भात*
*सांगता येत नाही...*
*वंशाला एका*
*दिव्याच्या आशेसाठी...!*

कवीने उपस्थित केलेला हा स्त्रीभ्रूण हत्येवरचा प्रश्न मेंदूच्या ठिकऱ्या उडवणारा आहे. कटी - मिठीवर, आलिंगन - चुंबनावर कविता लिहिणाऱ्या गुलछबू कामचलाऊ कवींना असे प्रश्न पडत नसतात. ते त्यांच्या दुनियेत खुश असतात. या सामाजिक भान तेजाळत ठेवणाऱ्या कवीचा नवीन कवितासंग्रह यायला हवा. या कवीच्या कवितांना अथार्च तेजस्वी सोनं लगडलं आहे.

कवी शंकर घोरसे राजकारणी सत्ताधीशांवरही आसूड उगारतात. त्यासाठी कवी निर्भय असावा लागतो. ते म्हणतात,

*पुढाऱ्यास सदा भ्रष्टाचारा वाव*
*घटनेशी घाव घालीतसे....!*

घोटाळ्यांचा कळस गाठणाऱ्या निगरगट्ट सत्ताधिशांचाही पुतळा उभारला पाहिजे; अशी विखारी टीका ते करतात.

सॉक्रेटीसचा शिष्य प्लेटो म्हणाला होता, राजसत्ता ही विवेकी, बुद्धिमान, सुज्ञ लोकांच्या हाती असावी. राज्यकर्ते शुद्ध चरित्र्याचे, निस्वार्थी, चिंतनशील असावेत. ज्ञानसाधनेत रमणारे असावेत. असा राज्यकर्ता शोधून तरी सापडेल का?



डी. बी. जगत्पुरिया
9860485398
मीरानगर, पडेगांव,
औरंगाबाद.

-------

(उर्वरीत भाग उद्या)

■ ■ ■

## मराठी भाषेला समृध्द करणारे साहित्यिक
# डॉ. नागनाथ कोत्तापल्ले

मराठीतील दिवंगत जेष्ठ साहित्यिक, विचारवंत डॉ नागनाथ कोत्तापल्ले यांची आज जयंती. मराठी साहित्य विश्वातील एक प्रतिथयश साहित्यिक म्हणून ओळखले जाणाऱ्या डॉ. नागनाथ कोत्तापल्ले सरांचा जन्म २९ मार्च १९४८ रोजी नांदेड जिल्ह्यातील मुखेड या गावी झाला.

डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांचे शिक्षण गावातीलच जिल्हा परिषदेच्या शाळेत झाले. १९६९ साली डॉ. नागनाथ कोत्तापल्ले सरांनी देगलुर येथून बी. ए. ची पदवी मिळवली. बी. ए. ची पदवी मिळवताना ते मराठवाड्यात तिसरे तर मराठी विषयात पहिले आले होते. त्यानंतर मराठवाडा विद्यापीठातून त्यांनी एम ए पूर्ण केले आणि १९८१ साली यु. म. पठाण सरांच्या मार्गदर्शनाखाली शंकरराव पाटील यांच्या साहित्याच्या चिकित्सक अभ्यास या विषयावर पी. एचडी. मिळवली.

१९७१ ते १९७७ या काळात त्यांनी बीड येथील महाविद्यालयात अध्यापन केले. अध्यापक म्हणून म्हणून पवित्र कार्य करताना त्यांनी अनेक विद्यार्थी घडवले. नागनाथ कोत्तापल्ले १९७७ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात प्राध्यापक होते त्यानंतर ते पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख बनले. २००५ ते २०१० पर्यंत कोत्तापल्ले सर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू होते.

डॉ. नागनाथ कोत्तापल्ले सरांनी १९७० पासून लेखनास सुरुवात केली. मुड्स हा त्यांचा कविता संग्रह १९७६ साली प्रसिद्ध झाला. त्यानंतर कर्फ्यु आणि इतर कथा व संदर्भ हे दोन कथा संग्रह प्रकाशित झाले. कवीच्या गोष्टी आणि सावित्रीच्या लेकी या त्यांनी लिहिलेल्या दीर्घ कथा त्या काळी त्या काळात खूप गाजल्या. या दरम्यान त्यांच्या गांधरीचे डोळे आणि मध्यरात्र या कादंबऱ्या आणि इतर बरेच ललित साहित्य प्रकाशित झाले.

डॉ. नागनाथ कोत्तापल्ले सरांनी कथा, कादंबरी, ललित लेख सोबतच समीक्षा लेखनही केले. साहित्याचा अन्वयार्थ, आधुनिक मराठी कविता, नव कथाकार शंकर पाटील, ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि बोध हे त्यांचे समीक्षात्मक ग्रंथ प्रसिद्ध आहेत. निवडक बी. रघुनाथ आणि स्त्री पुरुष तुलना या ग्रंथाचे संपादनही त्यांनी केले.

डॉ. नागनाथ कोत्तापल्ले सरांनी अनेक महत्वाच्या पदावर अध्यक्ष म्हणून काम केले. नॅक, राज्य मराठी विकास संस्था, साहित्य अकादमी, राज्य ग्रंथ पुरस्कार समिती, बाल पुरस्कार समिती आणि एच. एस. सी बोर्डाचे मराठी अभ्यास मंडळ अशा महत्वाच्या संस्थांचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले. याशिवाय मराठी साहित्य परिषदेचे कार्यवाहकपदही त्यांनी सांभाळले. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले सर काही नियतकालिकांचे संपादकही होते. २०१२ साली चिपळूण येथे झालेल्या ८६ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते.

जवळपास पाच दशके आपल्या समर्थ लेखणीने मराठी भाषेला समृद्ध करून डॉ. नागनाथ कोत्तापल्ले सर ३० नोव्हेंबर २०२२ रोजी आपल्यातून निघून गेले. वयाच्या ७४ वर्षी त्यांचे वृद्धापकाळाने निधन झाले त्यांच्या निधनाने मराठी विषयाची अपरिमित हानी झाली. त्यांच्या निधनाने मराठी साहित्य विश्वात कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले सरांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

-----------

श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

■ ■ ■

# गरोदरपणा आणि कोल्ड्रिंक्स...

गरोदरपणात महिलांनी त्यांच्या आहाराची विशेष काळजी घेतली पाहिजे. कारण या दिवसात अन्नाबाबत थोडीशीही निष्काळजीपणा गरोदर स्त्रीचे आरोग्य बिघडू शकते. गर्भधारणे दरम्यान डॉक्टर महिलांना अनेक गोष्टी खाऊ किंवा पिऊ नयेत याचा सल्ला देतात. कारण त्यामुळे आरोग्य बिघडण्याचा धोका असतो,

पण गरोदरपणात अनेक महिलांना प्रश्न पडतो की कोल्ड्रिंक्स पिऊ शकतात का? यामुळे शरीराला कोणते नुकसान होते का? कोल्ड्रिंक्समुळे साखरेची पातळी वाढू शकते का?

स्त्रीरोग विभागाच्या डॉ. सलोनी चड्ढा सांगतात की गर्भवती महिलांनी कोल्ड्रिंक्स पिणे टाळावे. याचे कारण म्हणजे कोल्ड्रिंक्समध्ये



साखरेचे प्रमाण जास्त असते, ज्यामुळे मधुमेहाचा धोका वाढू शकतो. काही कोल्ड्रिंक्समध्ये कॅफिनचे प्रमाण अधिक असते, ज्यामुळे महिलेला झोपेशी संबंधित समस्या उद्भवू शकतात.

कोल्ड्रिंक्समध्ये कृत्रिम गोड पदार्थ असतात, त्यामुळे मधुमेहाचा धोका देखील वाढू शकतो. जरी तुम्ही ते महिन्यातून एकदा पिऊ शकता, परंतु लक्षात ठेवा की तुमची साखरेची पातळी जास्त नसावी. जर तुमच्या साखरेची पातळी जास्त असेल तर कोल्ड्रिंक्स प्यायल्याने तुमच्या शरीराला नुकसानदायक ठरू शकते.

गरोदरपणात आहार कसा असावा?

गरोदरपणात शरीरासाठी फॉलिक ॲसिड आणि लोह खूप महत्वाचे असतात. यासाठी याची कमतरता भरून काढण्यासाठी औषधे देखील आहेत, परंतु यामध्ये खाण्याच्या सवयींकडेही विशेष लक्ष दिले पाहिजे. याशिवाय आहारात कॅल्शियम, प्रथिने आणि जीवनसत्त्वे चांगल्या प्रमाणात असावीत.

यासाठी आहारात ताजी फळे आणि भाज्या, संपूर्ण धान्य, डाळी आणि बीन्स आणि दूध झ दही यांचा समावेश करावा. या गोष्टींमध्ये प्रथिने, जीवनसत्त्वे आणि कॅल्शियम भरपूर प्रमाणात असतात. जर महिलांनी गरोदरपणात हे पदार्थ चांगल्या प्रमाणात खाल्ले तर आई आणि बाळ दोघेही निरोगी राहतात.

गरोदरपणात जड व्यायाम टाळा. दारू, सिगारेट आणि मद्यपान करू नका. फास्ट फूड खाऊ नका. वेळोवेळी डॉक्टरांचा सल्ला घ्या.

■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



# मानवता धर्म

जातपात धर्म देश
असो कोणताही
मानवता धमार्चे पालन
जगी सर्वश्रेष्ठ राही!

अनितीने वागता पेटतो
दोन्ही पक्षात वणवा
बरबाद होती पिढ्या
महाभारत आहे पुरावा!

अती लोभ क्रोध हा
सर्व पापांचा असे बाप
त्यावर नियंत्रण ठेवता
सुख शांती नांदे आपोआप!















## आज का अंदाज

शनिवार २९ मार्च २०२५

पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ४ | ५ | ७ | २ | ४ | ७ | ८ |
| १२० | ६९९ | ५०० | ७०० | ४८० | १४९ | ११५ | १३४ |
| ३०० | २६६ | ४५६ | ८९० | ६६० | २४८ | २२३ | २६० |
| २२९ | ४०० | ३५७ | ३४० | ५७० | ३४७ | ३५९ | ३५० |
| ३१ | ४१ | ५८ | ७८ | २१ | ४१ | ७० | ८० |
| ३० | ४० | ५६ | ७६ | २३ | ४५ | ७९ | ८९ |
| ३२ | ४२ | ५९ | ७९ | २५ | ४३ | ७६ | ८८ |


२९ मार्च: सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| २४ | ५४ | ८१ | ९१ |
| २६ | ५६ | ८७ | ९३ |
| २० | ५० | ८३ | ९७ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

## शब्दकोडे क्रमांक २०६९



**आडवे शब्द :-**
१) विष देणारा
४) अंगरखा
६) हृदय
८) मुक्काम, गंध
१०) डावरा
१२) *** गोटा एक तीव्र रेचक
१४) गोलमटोल
१७) हजार किलो
१८) छोटा डफ
२०) एक उडुपी पदार्थ
२२) सातू
२३) मीठ
२५) दृष्टी
२७) चामड्याचा दोर (हिं.)
३०) एक सुगंधी वनस्पती
३३) केविलवाणा
३५) रबरी चपला
३७) हालचाल
४२) छोटी ताटली
४३) विशेष बातमी
४४) एक बारीक धान्य
४५) कबर, थडगे
४७) उपयोग
४९) सेनेचा प्रमुख
५२) प्रामाणिक
५३) धमनी
५५) तीर
५६) तपश्चर्येची जागा
५९) केसाला लावण्याचा रंग
६१) आसक्त होणारा
६२) बत्त्याचा जोडीदार
६४) श्रीकृष्णाचे एक नाव,
६५) फक्त, केवळ
६६) भोजनशाळा, माजघर
६७) सदोदित
६९) बारदान
७०) केस कापणे
७२) पटल
७४) हालचालीवर ठेवलेली नजर
७५) खराब, टाकाऊ
७६) नव्वद अंशाच्या आतील कोन
७७) मुस्लीमांचा उपवासाचा महिना

**उभे शब्द :-**
२) कार्तिकस्वामीं
३) धुक्याचा थेंब
४) सोन्या-चांदीचा व्यापारी
५) गवंडी
६) कालू, समुद्रातील एक छोटा जीव
७) विश्व
८) यात्रेस जाणे
९) आयताकृती कापडी बैठक
११) खोड्या करण्याचा स्वभाव
१३) मागे पाऊल, मागे सरणे
१५) पृथ्वी
१६) गाजावाजा, बोभाटा
१९) नम्र, वाकलेला
२१) नूतन
२४) माया, प्रेम
२६) भारतीय सैनिक
२८) ताई ( हिं.)
२९) शर्यत (इं)
३१) पठण
३२) प्रामाणिक
३४) पालिकेतील लोकप्रतिनिधी
३६) एक पालेभाजी
३८) अर्धांगवायू
३९) माल साठविण्याची जागा
४०) नट्टापट्टा
४१) मालाची पोहोच देणारी चिठ्ठी
४२) जमिनीवरील कर
४४) जपजाप्य
४५) कामदेव
४६) कलंक
४८) धावत धावत
५०) मोठा हातोडा
५१) नवरा
५४) सक्षम
५५) अफवा
५७) उदर
५८) चांदणी
६०) छोटा, बारीक
६३) अगदी हुबेहुब
६४) मर्यादा
६६) किराणा व्यापारी
६८) सूर्याचे एक नाव
७०) वट, पारंब्याचा वृक्ष
७१) धमनी
७३) दरवाजा
७४) पान

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



## महत्त्वाचे

### चिमुकल्यांकडून चिऊताईंसाठी घरटे

**एकलहरे ।** मनपा शाळा क्र. ५० गोरेवाडी शाळेतील विद्यार्थ्यांनी सरला जगळे यांच्या मदतीने टाकाऊ वस्तूंपासून चिमण्यांच्या संरक्षणासाठी ७० घरटे व कृत्रिम जलपात्रे तयार केली. घरटे व जलपात्रे झाडावर लावली. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होते आहे. निसर्ग साखळीतील महत्त्वाचा



घटक चिमणी आहे. चिमणी निसर्गाचा खरा अविभाज्य घटक आहे. लहानपणापासून लहान-थोरांपासून चिमणीविषयी आपुलकीची भावना आहे. औद्योगीकरण आणि वृक्षतोड यामुळे चिमणीची संख्या कमी झाली आहे. गोरेवाडी मनपा शाळेतील विद्यार्थ्यांनी छोटे डबे, बाटलीचा खालचा भाग कापून वेगवेगळ्या प्रकारच्या भांड्यांना कल्पक बुद्धीने दोऱ्या बांधल्या आणि प्लॅस्टिकचे डब्यापासून जलपात्रे बनवली. दोन दिवसांत विद्यार्थ्यांनी ७० घरटे व जलपात्रे तयार केली आणि झाडावर लटकावली. उपक्रमासाठी मुख्याध्यापक प्रभारी रत्नाकर झडप, शिक्षक व कर्मचारी सुनिता धांडे, सरला जगळे, दर्शन मुठाळ,राकेश घाडगे यांनी पुढाकार घेतला.

### रक्ताने काढलेल्या चित्रांचे गिनीज वर्ल्ड रेकॉर्डसाठी प्रयत्न

**देवळाली कॅम्प ।** चित्रकार डॉ. संतोष कटारे यांनी आपल्या स्वतःच्या रक्ताने तयार केलेली विविध महापुरुषांची चित्रे गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डसाठी पाठविण्याचा निर्णय घेतला आहे. नवी दिल्ली येथे आयोजित एका भव्य पुरस्कार सोहळ्यात माजी आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू जोंटी रोड्स यांच्या हस्ते डॉ. संतोष कटारे यांना विशेष सन्मान प्रदान करण्यात आला. या प्रसंगी, त्यांनी आपल्या अनोख्या चित्रकले बद्दल उपस्थितांना माहिती दिली. स्वतःच्या रक्ताचा उपयोग करून ऐतिहासिक आणि प्रेरणादायी महापुरुषांची प्रतिमा साकारण्याची ही कला केवळ भारतातच नव्हे, तर संपूर्ण जगभरात चर्चेचा विषय ठरत आहे. या दुर्मिळ आणि क्रांतिकारक कलेला जागतिक पातळीवर मान्यता मिळावी, या उद्देशाने डॉ. कटारे यांनी गिनीज वर्ल्ड रेकॉर्डसाठी अर्ज दाखल केला आहे. या आगळ्या वेगळ्या आणि प्रेरणादायी कार्याबद्दल डॉ. कटारे यांचे विविध क्षेत्रांतून कौतुक होत आहे.

### वाढत्या ध्वनी प्रदूषणावर मविप्र पॉलिटेक्निक महाविद्यालयाचे संशोधन

**नाशिक ।** वाहनांच्या हॉर्नचा कर्णकर्कश आवाज...सतत आणि अनावश्यक होणारा वापर मोठ्या प्रमाणात ध्वनी प्रदूषण निर्माण करतो. विशेषता शहरी आणि रहदारीच्या क्षेत्रामध्ये ही



समस्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. मात्र यावर मविप्रच्या राजर्षी शाहू महाराज पॉलिटेक्निक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी संशोधनाअंती स्मार्ट उपाय शोधला आहे. या विद्यार्थ्यांनी 'स्मार्ट रियल टाइम हॉर्न नियंत्रण प्रणाली' विकसित केली आहे. ही प्रणाली शहरातील ध्वनी प्रदूषण रोखण्यास मदत तर करणार आहेच, शिवाय वाहतुकीच्या नियमांचे पालन, पर्यावरण संवर्धन आणि नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेणार आहे सद्यस्थितीत शहरी आणि ग्रामीण भागातील वाहतुकीच्या वाढत्या समस्येमुळे अनावश्यक हॉर्न वाजविण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे ध्वनी निर्माण होणे, यावर उपाय म्हणून स्मार्ट रियल-टाइम हॉर्न नियंत्रण प्रणाली विकसित केली गेली आहे. स्मार्ट सेन्सर मायको कट्रोलर आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स तंत्रज्ञानाच्या मदतीने कार्य करणारी ही प्रणाली आहे. वाहनांच्या हॉर्नचा वापर नियंत्रित करून चालकाच्या सुरक्षिततेला प्राधान्य देणारी प्रणाली आहे. राजर्षी शाहू महाराज पॉलिटेक्निकमधील डिप्लोमाच्या तृतीय वर्ष शाखेतील अथर्व सोनार, आदित्य माडीवाले, आशिष रणमळे, हर्ष पवार या विद्यार्थ्यांनी ही प्रणाली तयार केली आहे. यासाठी त्यांना मविप्रचे शिक्षणाधिकारी डॉ. लोखंडे, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रशांत पाटील, मार्गदर्शक योगेश कोढीलकर, विषयप्रमुख वाय. एम. हळदे, विभागप्रमुख भूषण देशमुख यांचे मार्गदर्शन लाभले. या संशोधनाबद्दल मविप्रचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, सभापती बाळासाहेब क्षीरसागर, अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले, उपाध्यक्ष विश्वास मोरे, चिटणीस दिलीप दळवी, उपसभापती देवराम मोगल व सर्व संचालक मंडळाने कौतुक केले आहे.

## महारांगोळी..!




नाशिक महानगरपालिका व नववर्ष स्वागत समिती नाशिकच्यावतीने जुने भाजी पटांगण गोदाघाट येथे महारांगोळी साकारण्यात आली आहे. (छाया : सोज्वळ साळी)

### अहिल्यादेवी होळकर यांना समर्पित महारांगोळी गोदाकाठी साकार

**नाशिक ।** हिंदू नववर्षा स्वागत महोत्सवनिमित्त गोदाकाठी वीस हजार स्क्वेअर फुटाचे महाराणी शंभर महिलांच्या योगदानातून साकारलेली आहे. या महा रांगोळीच्या माध्यमातून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या आयुष्यातील प्रेरणादायी प्रसंग दाखवण्यात आले आहेत.

यातून त्यांच्या आयुष्यातील कर्तृत्व नेतृत्व व दातृत्व त्यांच्या जन्माच्या त्रिशताब्दी वर्षानिमित्त अधोरेखित केले आहे. हिंदू समाजाच्या एकत्वासाठी अस्मितेसाठी अनेक मठ मंदिरे घाट धर्मशाळा विहिरी त्यांनी भारतातील ४१ वेगवेगळ्या ठिकाणी सुमारे २०००बांधकामे केली त्यातून प्रजा हितरक्षण झाले त्याचे चित्रीकरण या रांगोळीतून केले आहे. सुराज्य व प्रजाहीतरक्षण साठी केलेले कृषी विषयी व आर्थिक नियोजन याचेही चित्रीकरण या महारांगोळीत आले आहे. या रांगोळी चा प्रथम ठिपका ठेवण्यासाठी नानासाहेब होळकर हे अहिल्यादेवींचे आठवे वंशज उपस्थित होते. त्याचबरोबर यांप्रसंगी महिला कीर्तनकार प्रेरणा बेळे यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे चरित्र सर्वांसमोर मांडले.

याप्रसंगी अध्यक्ष शिवाजीराव बोंदार्डे, चंद्रशेखर जोशी, राजेश दरगोडे, आरती गरुड, सुजाता कापुरे , निलेश देशपांडे उपस्थित होते. आभार प्रदर्शन मयुरी शुक्ल यांनी केले.वरील कार्यक्रम नाशिक महानगरपालिका व नववर्ष स्वागत समितीच्या संयुक्त विद्यमाने साकार करण्यात आला.

# राज्यातील ६४ लाख शेतकऱ्यांना मिळणार २५५५ कोटी विमा नुकसान भरपाई

## मागील हंगामांतील प्रलंबित भरपाई थेट खात्यात जमा होणार : ॲड. कोकाटे

(राम सुरसे यांजकडून)

**वावी ।** राज्यातील तब्बल ६४ लाख शेतकऱ्यांना मोठा दिलासा देणारा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला असून, त्यांच्या खात्यावर थेट रु. २५५५ कोटी (दोन हजार पाचशे पंचावन कोटी)विमा नुकसान भरपाई जमा होणार आहे. शासनाने आज विमा कंपन्यांना देय असलेला प्रलंबित राज्य हिस्सा अनुदान म्हणून रु. २८५२ कोटी वितरित करण्यास मान्यता दिली आहे.

या निर्णयामुळे मागील विविध हंगामांतील प्रलंबित नुकसान भरपाईची रक्कम शेतकऱ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर थेट जमा होणार आहे. ही प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सूचना विमा कंपन्यांना देण्यात आल्या असून, शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळणार असल्याचे कृषी मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी सांगितले.

या अंतर्गत खरीप २०२२ आणि रब्बी २०२२-२३ या हंगामांसाठी रु. २.८७ कोटी, खरीप २०२३ साठी रु. १८१ कोटी, रब्बी २०२३-२४ साठी रु. ६३.१४ कोटी आणि खरीप २०२४ साठी रु. २३०८ कोटी इतकी नुकसान भरपाई शेतकऱ्यांना वितरित होणार आहे.एकूण रु. २५५५ कोटी रकमेचा लाभ राज्यातील ६४ लाख लाभार्थी शेतकऱ्यांना मिळणार आहे.

शासनाने विमा कंपन्यांना निधी वितरित केला असून, नुकसान भरपाईची रक्कम तातडीने शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होईल. या निर्णयामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल. उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी वित्त विभागा मार्फत २५५५ कोटी रु उपलब्ध करून दिल्यामुळे ही शक्य झाले आहे असे कृषी मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे म्हणाले.



> सिन्नर तालुक्यातील शेतकरी वारंवार सदर पिकविमा संदर्भात कृषी कार्यालयात विचारणा करत होते. राज्य शासनाने सदर पिक विमा भरपाई मंजूर करून सिन्नर तालुक्यातील शेतकऱ्यांसह राज्यातील शेतकऱ्यांना मोठा आर्थिक दिलासा दिला आहे.सदर पिक विमा रक्कम लवकरच शेतकरी बँक खात्यात जमा होईल.
>
> **- ज्ञानेश्वर नाठे, कृषी अधिकारी सिन्नर तालुका**

> पिक विमा मंजूर झाल्यामुळे शेतकर्यांना दिलासा मिळाला असून त्यामुळे येत्या खरीप हंगामासाठी शेतकरी यांना काही स्वरूपात आर्थिक हातभार लागणार आहे. त्या बद्दल मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजितदादा पवार, एकना शिंदे व राज्याचे सक्षम कृषीमंत्री माणिकराव कोकाटे याचे आभार.
>
> **- कैलाश जाजू, शेतकरी वावी ता. सिन्नर**

# वेतन पथक अधीक्षकाची शिक्षक नेत्याशी अरेरावी

**पिंपळगाव बसवंत ।** फरक बिलांची विचारणा करणाऱ्या एका शिक्षक नेत्यास नासिक येथील वेतन पथक अधीक्षक नितीन पाटील यांनी गुरुवारी सायंकाळी अरेरावीची भाषा वापरत धक्काबुक्की केल्याची घटना घडली.

या निंदनीय प्रकाराबाबत जिल्हाभरातील शिक्षक व शैक्षणिक संस्थेमध्ये संतापाची तीव्र लाट उसळली असून, नितीन पाटील यांचा निषेध केला जात आहे. याबाबत शनिवारी दुपारी तीन वाजता खासदार भास्कर भगरे, आमदार किशोर दराडे, आमदार सत्यजित तांबे यांच्या प्रमुख उपस्थितीत वेतन पथक कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात येणार असून, शिक्षकांसोबत गुंड प्रवृत्तीची वर्तणूक करणाऱ्या अधीक्षक नितीन पाटील यांना सेवेतून निलंबित करण्याची मागणी करण्यात येणार असल्याची माहिती नाशिक जिल्हा टीडीएफ चे नेते शिवाजीराव निरगुडे जिल्हाध्यक्ष रवींद्र मोरे शिक्षक नेते बाळासाहेब ढोबळे बाळासाहेब देवरे यांनी दिली. नासिक विभागातील शिक्षकांची विविध प्रकारची तब्बल ११० कोटी रुपयांची देयके अनेक वर्षापासून थकीत आहे. संबंधित शाळा व शिक्षकांनी सर्व पूर्तता करून दिल्यानंतरही मार्च महिना संपल्यात जमा असताना अजून शिक्षकांना त्यांच्या हक्काची बिले मिळालेली नाही. याबाबत वेळोवेळी शिक्षकांकडून विचारणा केल्यानंतर अधीक्षक नितीन पाटील उडवा उडवीची उत्तरे देतात. अरेरावी करतात. असा अनुभव अनेक शिक्षकांना आलेला आहे तसेच दलालांमार्फत बिले मंजुरीसाठी रक्कम मागितली जाते. रक्कम दिल्याशिवाय थकीत बिलांना मंजुरीच मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. या संदर्भात आपल्या एका नातेवाईकाच्या बिलाबाबत विचारणा करण्यास गेलेल्या शिक्षक नेत्यास गुरुवारी सायंकाळी पाच वाजता अधीक्षक नितीन पाटील यांनी असभ्य वर्तन केले. दरम्यान नितीन पाटील यांची अरेरावी व शिक्षक नेत्यास केलेल्या धक्काबुक्कीची वार्ता जिल्ह्यातील शिक्षकांपर्यंत पोहोचताच या घटनेबाबत शिक्षकांनी तीव्र संताप व्यक्त करत नितीन पाटील यांच्या निलंबनाची मागणी केली असून, आधीच भ्रष्टाचाराची कीड लागलेले वेतन पथक कार्यालय शिक्षकांच्या रोषाचे केंद्र बनले आहे.

> **शिक्षक हा समाज घडविण्याचे काम करतो समाजात शिक्षकाला एक वेगळी प्रतिष्ठा आहे मात्र अधीक्षक नितीन पाटील हे अनेक वर्षापासून शिक्षकांचे खिसे कापण्याचे काम करत असून शिक्षक नेत्यास केलेली अरेरावी शिक्षक संघटना कदापि सहन करणार नाही. नितीन पाटील यांच्या लाचखोरी बाबत दोन, तीन महिन्यापूर्वी खासदार, आमदार यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक होऊन पाटील यांना तंबी देण्यात आली होती. मात्र त्यांच्यात सुधारणा झाली नाही म्हणूनच नितीन पाटील यांचे निलंबन करावेच लागेल. अन्यथा वेळप्रसंगी शिक्षक संघटना संप पुकारतील.**
>
> **- प्राचार्य रवींद्र मोरे, जिल्हाध्यक्ष, टीडीएफ, नाशिक**

# सटाणा मार्केट निवडणूक धक्कादायक निकाल लागणार

(अशोक थोरात यांजकडून)

**सटाणा ।** बीड मधील आ.धनंजय मुंढे, धनंजय देशमुख, आ.सुरेश धस व वाल्मीक कऱ्हाड अचानक एकत्र आल्यावर राज्यातील जनतेला जसा धक्का बसेल तसाच कृषी उत्पन्न बाजार समीती सटाणा निवडणुकीत झालेल्या घडामोडी व तयार झालेले पॅनल बघता बागलाणला नव्हे तर जिल्ह्याला धक्का बसला आहे.

राजकीय मतभेद नव्हे तर कट्टर दुष्मनी अनेक वर्ष जपणारे नेते एकाच पॅनलचे उमेदवार झाले आहेत. प्रशांत बच्छाव, नानाजी दळवी, केवळ दळवी विरूध्द डॉ. विलास बच्छाव यांनी पंचवीस वर्षांचे राजकीय वैर बाजुला सारून एकाच पॅनल मध्ये स्विकारलेली उमेदवारी सर्वत्र चर्चेचा विषय आहे. अपेक्षे प्रमाणे राघोनाना अहिरे, नानाजी दळवी व डॉ.विलास बच्छावांचे पॅनल होणार होते. पण अचानक काही तरी चमत्कार झाला व ऐन वेळी प्रशांत बच्छावांची या पॅनलशी युती झाली. सर्वांनी बिनविरोधची हवा केली. डांगसौंदाण्याचे हेवी वेट नेते संजय सोनवणे, राहुल सोनवणे वगैरे खवळले. आपसात बरीच वादावादी




झाली व या तगड्या पॅनलला आव्हान देण्यात आले. याच प्रस्थापितांना विरोध म्हणुन समोरचे पॅनल तयार झाले. सबकुछ लखमापुर असे निवडणुकीचे चित्र आहे. डॉ.विलास बच्छाव, नानाजी दळवी हे दोघे मविप्रचे माजी उपसभापती असुन केवळ दळवी हे लखमापुरचे हेवी वेट नेते आहेत. नानाजी दळवींनी सलग सहा वर्ष मार्केटचे चेअरमन पद व पाच वर्ष संचालक मंडळाचे नेते म्हणुन काम केले आहे. म्हणजेच लखमापुरचे तिघे उमेदवार चेअरमन पदासाठी सक्षम रहातील. मार्केट मध्ये तिजोरीचा खडखडाट व अनावश्यक नोकरभरतीचा ठपका ठेवला जात असला तरी विरोधी नेते संजय सोनवणेंनी तसे काही नाही असे सांगीतले. मावळते संचालक मंडळ आ. दिलीप बोरसे व पप्पुतात्या बच्छाव याच्याच नेतृत्वाखाली होते व संजय सोनवणे संचालक व चेअरमन होते. या निवडणुकीत आ.दिलीप बोरसेंचे कट्टर समर्थक प्रशांत बच्छाव व संजय सोनवणे यांनीच दोन पॅनल केल्याने सात वर्षाच्या मैत्रीला सुरूंग लागला आहे. आ. दिलीप बोरसे व माजी आमदार संजय चव्हाण, दिपीका चव्हाणांना निवडणुकीत उघड भाग घेता येत नाही. कारण दोघांचे समर्थक दोन्ही पॅनलचे उमेदवार आहेत. फक्त गुपचुप आपल्या समर्थकांना पडद्याआडुन समर्थन द्यावे लागणार असुन पॅनल टु पॅनल मतदान होणे अवघड असल्याने दोन्ही पॅनलचे कमी अधिक संचालक निवडुन येतील व नंतर काय होईल सांगता येणार नाही. नाशिकला पिंगळे चुंबळे चमत्कार जिल्ह्याने बघीतलाच आहे. कोणत्याही निवडणुकीत पैशांचा खेळच महत्वाचा ठरतो. पैसे घेऊन मत मिळतेच असे पण नसते. बरेच मतदार दोन्ही पॅनलचे पाकीट घेतात व काही उमेदवार वैयक्तीक एक मत मागतांना लहान पाकीट देतात. आर्थिक सक्षम उमेदवार व थोडे कमकुवत उमेदवार असले तरी मतदार काय करतील हे सांगणे अवघड आहे. पण लखमापुरच जास्त चर्चेत आले आहे. सात पैकी तीन लखमापुरचे हा चर्चेचा विषय ठरला आहे.लजर लखमापुरचे तिघे मातब्बर निवडले तर राज्यात लखमापुर आदर्श गाव ठरणार आहे. पण हे शक्य आहे का? हे निकाला नंतरच कळेल. शेतकरी विकास पॅनल विरूध्द यशवंत शेतकरी विकास पॅनल मध्ये घमासान सुरू आहे. लोकसभा विधानसभा वगळता सर्वच संस्थांच्या निवडणुका थांबल्याने सर्वच कार्यकर्ते मार्केट वर समाधान समजुन कामाला लागले आहेत. राघोनाना अहिरे जिल्हा बँकेचे माजी चेअरमन व संचालक होते व त्यांच्याकडे आठ कोटी पेक्षा जास्त वसुली केली जाणार आहे. तो पण या निवडणुकीत प्रचाराचा मुद्दा तयार करण्यात असल्याने मतदारात चलबिचल झाली आहे. लखमापुरचे तीन व ब्राम्हणगावचे दोन उमेदवार राघो नाना, प्रशांत बच्छाव व डॉ. विलास बच्छाव पॅनल मध्ये असल्याने अठरा पैकी पाच या दोन गावात असल्याने इतर गावातील मतदार काय करतात हे बघावे लागेल. पण शेवटी पैसा काय करेल हे काळच ठलवेल. कृषी उत्पन्न बाजार समितीला अच्छे दिन यावेत या साठी अभ्यासु नेते डॉ.विलास बच्छाव व अनुभवी नेते नानाजी दळवींच्या ताब्यात मतदार देतील अशी शक्यता जास्त असुन वैयक्तीक मतभेद बाजुला ठेऊन सर्व जुने मतभेद विसरून एकत्र आलेल्या लखमापुरकरांमुळे मार्केटचे भवितव्य चांगले राहील हे नक्की. पॅनल तयार होण्याआधी आजपर्यंत मार्केटची निवडणुक न लढवलेल्या डॉ.विलास बच्छावांच्या नेतृत्वाखाली बिनविरोध निवडणुक करावी अशी इच्छा अनेकांनी बोलुन दाखवली होती. पण माशी शिंकली व निवडणुक लागली. बिनविरोध म्हणजे निवडणुक खर्चात बचत झाल्यावर स्वच्छ कारभार करायला बळ मिळते हे लक्षात घेत मतभेद विसरून भविष्यात बागलाणात बिनविरोध निवडणुकीचा पॅटर्न सुरू झाला तर सर्वांना समाधान मिळेल.



# बालांगण



## शेफ व्हायचंय?

मित्रमैत्रिणींनो, तुम्ही रेस्टॉरंट्स, कॅफेमध्ये जेवायला जाता. तिथे छान छान पदार्थ मिळतात. या पदार्थांवर आकर्षक सजावट केलेली असते. कधी नेहमीच्याच पदार्थांना ट्विस्ट दिला जातो. हे सगळं शेफच्या मार्गदर्शनाखाली होत असतं. रेस्टॉरंट्समधल्या किचनचा सगळा ताबा शेफकडे असतो. मोठमोठ्या हॉटेल्समध्ये शेफना खूप मान असतो. हे कौशल्य विकसित करण्यासाठी तुम्ही कलनरी आर्टसशी संबंधित अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊ शकता.

स्वयंपाकाची आवड असणाऱ्यांना हे क्षेत्र खुणावतं. शेफ बनण्यासाठी तुमच्यात प्रयोगशीलता, कल्पकता असायला हवी.

**कोण होणार?**

काहीतरी नवं करून बघण्याची, नवं शिकत राहण्याची तयारी असायला हवी. भारतासह जगभरातल्या खाद्यपदार्थांचं, स्वयंपाकाच्या पद्धतींचं ज्ञान मिळवणं गरजेचं आहे. लोकांच्या आवडीनिवडींनुसार चविष्ट पदार्थ बनवण्याचं तंत्र तुम्ही अवगत करून घ्यायला हवं. यासोबतच संवादकौशल्य, संशोधनाची तयारी, व्यवस्थापनकौशल्य या बाबीही महत्त्वाच्या आहेत.

कोणत्याही शाखेतले विद्यार्थी कलनरी आर्टसकडे वळू शकतात. बारावीनंतर 'क्विजीन टेक्नॉलॉजी', 'हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजी' किंवा 'हॉटेल मॅनेजमेंट' या विषयांमध्ये पदवी मिळवता येईल. यासोबत 'शेफ मॅनेजमेंट' या विषयात डिप्लोमा किंवा सर्टिफिकेट कोर्स करता येईल. पुरेशा अनुभवानंतर एक्झिक्युटिव्ह शेफ, सॉस शेफ, एक्सपिडिटर, कुक, कुक असिस्टंट म्हणून काम करू शकता. यासोबतच खाद्यपदार्थांशी संबंधित विविध कंपन्यांमध्येही संधी उपलब्ध असतात.




## उन्हाळ्यातला पेहराव

मुलांनो, आता उन्हाळा सुरू झाला आहे. तेव्हा या काळातील कपडे निवडताना काळजी घ्या. या उष्ण वातावरणात हलके आणि त्वचा श्वास घेऊ शकेल असे कपडे घालणे गरजेचे आहे. सूती किंवा लिनन कापड वापरले तर त्वचेला आराम दायक असते आणि ते घामही शोषून घेतात. म्हणूनच असे कपडे वापरा. कपड्यांचा रंग हलका असावा, कारण गडद रंग सूर्यप्रकाशात जास्त उष्णता शोषून घेतात. शर्ट आणि पँट्स किंवा शॉर्ट्स घालणे योग्य ठरेल. अशा कपड्यांमध्ये तुम्हाला आराम मिळेल. त्याचप्रमाणे बाहेर पडताना सनग्लासेस, हॅट किंवा कॅप वापरणेही गरजेचे आहे कारण या गोष्टी सूर्याच्या तीव्रतेपासून संरक्षण करतात.

**हे आहे गरजेचे**

### ठिपके जुळवा



## एकसारखं टेन्शन येतंय?

छोट्या मित्रांनो, तुम्हाला कधीकधी ताणतणाव जाणवतो का? भीती वाटते का? असे होत असेल तर वेळीच आई-बाबांना सांगा कारण फार काळ या अवस्थेत राहिल्यास वाईट परिणाम बघायला मिळतात.

ताणतणावाच्या अवस्थेत शरीरात अचानक अॅड्रेनालाईन किंवा कॉर्टिसोल सारख्या ताण संप्रेरकांचा पूर येतो. परिणामी हृदयाचे ठोके वाढतात. रक्तदाब देखील वाढतो. म्हणजेच ताणतणाव केवळ हृदयावर आणि मनावरच नाही तर संपूर्ण शरीरावर परिणाम करतो. मात्र ताण उत्पन्न होण्याची परिस्थिती निवळल्यास तुम्हाला परत सामान्य वाटते. आधीसारखे बरे वाटू लागते. म्हणजेच आपले शरीर कमी प्रमाणात ताण सहन करण्यास तयार असते. परंतु ताण दीर्घकाळ किंवा दीर्घकालीन होतो तेव्हा मात्र वाईट परिणाम देणारा ठरतो, हे आपण लक्षात घ्यायला हवे.

**असं का होतं?**

याचे आपल्या शरीरावर अनेक वाईट परिणाम दिसू शकतात. जसे की, पोटात काहीतरी जाणवते. एक विचित्र अस्वस्थता किंवा वेदना जाणवू शकतात. तीव्र ताण बराच काळ राहिला तर हृदयाच्या धमन्यांमध्ये जळजळ देखील होऊ शकते. छाती भरुन आल्यासारखी वाटते. तणावाचा सामना करताना कोलेस्टेरॉलच्या पातळीवरही परिणाम होतो. म्हणूनच फार काळ तणावात राहू नका. तो टाळण्यासाठी कामाचे चांगले व्यवस्थापन करा. भरपूर मित्र बनवा आणि एकमेकांशी जोडलेले रहा. दरतोज व्यायाम करायला विसरू नका. दररोज रात्री चांगली झोप घ्या. या सगळ्यामुळे तुम्ही फ्रेश आणि तणावमुक्त राहू शकाल.



## ओळखा पाहू

**जिज्ञासा**

१) 'नोकिया' ही कोणत्या देशातली कंपनी आहे?
२) सूर्यमालेतला हिरवा ग्रह कोणता?
३) बुकर पुरस्कार मिळवणारी भारतातली पहिली महिला लेखिका कोण?
४) भारतीयांनी विकसित केलेला पहिला सुपर कॉम्प्युटर कोणता?
५) क्युबा या देशाचं चलन कोणतं?
६) 'उगवत्या सूर्याचा देश' असं कोणाला म्हटलं जातं?
७) पाण्याचा अभ्यास करणाऱ्या शास्त्रज्ञांना काय म्हणतात?
८) आयसीआरएचं पूर्णरुप काय?
९) जगातला सर्वात मोठा पक्षी कोणता?
१०) भारतातला सर्वात लहान केंद्रशासित प्रदेश कोणता?


उत्तरं : १) फिनलँड २) युरेनस ३) अरुंधती रॉय ४) परम ८००० ५) पेसो ६) जपान ७) हायड्रोलॉजिस्ट ८) इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च ९) शहामृग १०) लक्षद्वीप

## तिखटपणा मोजायचाय?

तिखट, मसालेदार पदार्थांमध्ये आई मिरचीचा वापर करत असल्याचे तुम्ही बघत असाल. पण मिरचीचा तिखटपणा केवळ चवीनुसारच नाही तर एका वैज्ञानिक प्रमाणानुसार मोजला जातो हे तुम्हाला माहिती आहे का? चला तर मग, आज या 'स्कोव्हिल स्केल' बाबत जाणून घेऊ या.

हे स्केल एका युनिटमध्ये मिरचीचा तिखटपणा मोजते आणि मिरचीमध्ये कॅप्सेसिन नावाचा घटक किती असतो हे सांगते कारण या घटकाचमुळेच आपले तोंड पोळते. थोडक्यात स्कोव्हिल स्केल हे वैज्ञानिक स्केल मसालेदार अन्नाचा तिखटपणा मोजण्यासाठी वापरला जाते.

हे अमेरिकन फार्मासिस्ट विल्बर स्कोव्हिल यांनी १९१२ मध्ये विकसित केले. मिरचीचा तिखटपणा मोजण्यासाठी स्कोव्हिल ऑर्गनोलेप्टिक चाचणी केली जाते. यामध्ये, मिरचीचा अर्क पाण्यात मिसळला जातो आणि नंतर पॅनेलमध्ये बसलेली एक टीम किती प्रमाणात पाणी घालावे याची चाचणी करते जेणेकरून त्या मिरचीचा तिखटपणा जाणवू नये. जितके जास्त पाणी लागेल तितकी मिरची तिखट समजली जाते.




आता काही प्रसिद्ध मिरच्यांचे स्कोव्हिल रेटिंग जाणून घेऊ या.

* **बेल पेपर** – ही सर्वात सौम्य मिरची आहे आणि त्यात तिखटपणा अजिबात नाही.

* **जलापेनो** – ३,५००–८,००० एसएचयू (स्कोव्हिल हीट युनिट्स)

ही मिरची भारतीय जेवणातही खूप लोकप्रिय आहे आणि तिचा तिखटपणा मध्यम असतो.

**माहिती असावे**

* हबानेरो – १००,०००–३५०,००० एसएचयू

ही मिरची खूप तिखट असते आणि ती खाणे खूप आव्हानात्मक असू शकते.

* **कॅरोलिना रीपर** – १,४००,०००–२,२००,००० एसएचयू

ही जगातील सर्वात तिखट मिरची मानली जाते.

* **पेपर एक्स** – ३,१८०,००० एसएचयू

पेपर एक्स ही आतापर्यंतची सर्वात तिखट मिरची असल्याचे म्हटले जाते आणि तिखटपणाबद्दल गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये तिची नोंद झाली आहे.

### चित्र रंगवा



## असा असतो चतुर



मित्रांनो, तुम्ही चतुर नावाच्या कीटकासोबत कधी खेळला आहात का? काही मुले त्याच्या शेपटीला दोरा बांधून अघोरी खेळही खेळतात. हे अगदी चुकीचे आहे. पण तुम्हाला या कीटकाबद्दल माहिती आहे का? नसेल तर हे नक्की वाचा.

मित्रांनो, चतुरला इंग्रजीत ड्रॅगन फ्लाय आणि हिंदीत व्याधपतंग असे म्हणतात. जगभरात त्याच्या हजारो जाती आहेत. बर्फाळ प्रदेश सोडला तर उष्ण आणि दाट प्रदेशात चतुरांचा वावर आढळतो. त्याचे शरीर तीन भागांमध्ये बनलेले असते. पहिल्या भागात दोन पाय असतात. पायांचा उपयोग आधार घेण्यासाठी तसेच धरून बसण्यासाठी होतो. चालण्यासाठी मात्र पायांचा उपयोग होत नाही. या कीटकाचा प्रत्येक पंख स्वतंत्रपणे हलू शकत असल्यामुळे उडण्याची क्षमता प्रचंड असते. म्हणजेच चतुर ५० ते ६० किमी. वेगाने उडू शकतो. तो जोरदार वाऱ्याचा सामनाही सहजपणे करु शकतो. तो हवेत घिरट्या घालू शकतो तसेच एकाच जागी बराच काळ उडतही राहू शकतो.


चतुराच्या संरचनेवर आधारितच विमान तयार करण्याचे तंत्र वैज्ञानिकांनी विकसित केले, असे काहीजण मानतात.

चतुर दिसायला अगदी सुंदर असतात. त्याचे डोळेही सुंदर असतात. डोळ्यांचे नीट निरीक्षण केले असता छोट्या-छोट्या आकारात हजारो लेन्सेस दिसतात. म्हणून त्याची नजर 'क्लीअरकट व्हिजन' असल्याचे आपण म्हणतो. चतुरांना डोकं कसंही, कुठेही वळवता येतं. त्यामुळे हव्या त्या कोनातून ते पाहू शकतात. चतुराला ३६० अंश कोनात दिसतं.

**भवताल**

चतुरांचं आयुष्यही एक गूढ प्रवास आहे. मादी आपली अंडी बहुधा तळ्याच्या किंवा डबक्याच्या काठावर तसेच चिखलात घालते. काही जातीत अंडी घालताना नर आणि मादी एकत्र उडतात. एकावेळेस मादी शेकडो ते हजारो अंडी घालते. काही आठवड्यात अंड्यांमधून अळ्या बाहेर पडतात. या अळ्या पूर्णपणे पाण्याखालीच जगतात. त्या कधी कधी दोन-तीन वर्षांपर्यंत पाण्यातच वावरतात पण पाण्यातून बाहेर पडताच अवघे सहा-सात महिनेच ते जगतात. जलचर छोटे किडे आणि मासे हे या अळ्यांचे भोजन असते.

## शेअर करा गुगल सर्च




मुलांनो, गुगल हे जगातलं सर्वात लोकप्रिय सर्च इंजिन आहे. इंटरनेट सर्फिंगसाठी तुम्ही गुगल क्रोमचा वापर करता. त्यावरचे सर्च रिझल्ट्स आपल्याला शेअर करायचे असतात. यासाठी यूआरएल कॉपी करून पेस्ट करण्याचा एक पर्याय आहे. यासोबत 'लेट मी गुगल दॅट फॉर यू' हा ऑप्शनही निवडला जातो. मात्र आता गुगलवरचे सर्च रिझल्ट्स थेट शेअर करता येणार आहेत. यासाठी गुगलने शेअर बटण उपलब्ध करून दिलं आहे. यामुळे अभ्यासाशी किंवा प्रोजेक्टशी संबंधित सर्च रिझल्ट्स झटपट शेअर करता येतील.

गुगल सर्च शेअर करण्यासाठी सर्वात आधी स्मार्टफोनमधलं गुगल ॲप ओपन करा. आता सर्च बारमध्ये जाऊन तुम्हाला हव्या असणाऱ्या माहितीसाठी सर्च द्या. यानंतर सर्च बारच्या उजव्या बाजूच्या शेअर आयकॉनवर टॅप करा. इथे रिझल्ट्स शेअर करण्याचे विविध पर्याय दिसतील. त्यापैकी एका पर्यायाची निवड करून तुमचे सर्च शेअर करता येतील. हा शेअरचा ऑप्शन सध्या फक्त अँड्रॉइडच्या बीटा व्हर्जनमध्ये उपलब्ध आहे.

**स्मार्ट टॉक**

शेअर आयकॉनवर टॅप केल्यानंतर गुगल सर्च रिझल्ट्स शेअर करण्यासाठी एक लिंक उपलब्ध करून दिली जाईल. त्यात कॉपी फॉर क्लिपबोर्ड तसंच जीमेल, फेसबुक किंवा ड्रॉपबॉक्सच्या माध्यमातून शेअर करण्याचे पर्याय दिसतील. यापैकी एका पर्यायाची निवड तुम्ही करू शकता.

**धोका ओळखा**

### अशी घ्या काळजी

उन्हाळ्यात फिरताना काही धोके होऊ शकतात. त्यापासून बचाव करण्यासाठी खालील गोष्टी लक्षात ठेवा जसे की, कडक उन्हात फिरल्याने अंग जळजळते. सूर्याच्या तीव्र किरणांमुळे जळजळ होऊ शकते.

त्यामुळे घराबाहेर पडताना सनस्क्रीन लावणे आणि शक्यतो छत्री घेणे आवश्यक आहे. उन्हात फिरताना थकवा, मळमळ आणि गोंधळलेपण जाणवले तर थोडा वेळ विश्रांती घ्या. गारव्याला झाडाच्या सावलीखाली बसा. या काळात कीटकदंशापासून दूर राहण्यासाठी कीटकदंश प्रतिबंधक क्रीम किंवा स्प्रेचा अवश्य वापर करा.



**माहिती आहे?**


### असा तयार होतो माठ



उन्हाळ्यात आपण मातीच्या माठातील थंडगार पाणी पितो आणि तहान भागवतो. पण माठ तयार करण्याची प्रक्रिया तुम्ही जाणता का? मुलांनो, माठ तयार करण्यासाठी सर्वप्रथम गुळगुळीत आणि चिकट माती निवडली जाते. ती मऊ करण्यासाठी पाणी मिसळले जाते. नंतर चाकावर माती ठेवून हाताने किंवा साधनांचा वापर करून माठाचा आकार दिला जातो. माठाचा डोक्याचा भाग मोठा असतो. सजावटीसाठी त्यावर वेगवेगळे डिझाईन्स केली जातात. तयार झालेला माठाला थोडा वेळ उन्हात सुकवतात. नंतर त्यावर रंगकाम केले जाते. त्यामुळे तो सुंदर आणि टिकाऊ होतो.

**लक्षात घ्या**

### नको टीव्हीचा अतिरेक



टीव्ही जास्त पाहण्याचे काही तोटे आहेत. जसे की, टीव्ही जास्त पाहिल्याने शरिराची क्रियाशीलता कमी होऊ शकते. त्यामुळे वजन वाढणे आणि शरीर कमजोर होते. टीव्ही खूप वेळ पाहिल्याने डोळ्यांना ताण पडत असल्यामुळे डोळे दुखणे, चुरचुर, आणि दृष्टी कमी होणे हे त्रास संभवतात. सतत टीव्ही पाहण्यामुळे मानसिक विकासावरही परिणाम होऊ शकतो. त्याचबरोबर बाहेर खेळायला किंवा अभ्यास करण्यास वेळ मिळत नाही. मुख्य म्हणजे टीव्ही जास्त पाहण्यामुळे आपली सर्जनशीलता आणि शिकण्याची आवड कमी होऊ शकते. म्हणूनच सुट्टीच्या काळात टीव्ही कमी बघा आणि भरपूर खेळा.

# प्रचंड चढ-उतारानंतर बाजार घसरणीसह बंद



## सेन्सेक्समध्ये 192 अंकांची तर निफ्टीत 72 अंकाची घसरण



**मुंबई, दि.२८ प्रतिनिधी**

आज शेअर बाजाराचा व्यवहार हिरव्या चिन्हात सपाट पातळीवर सुरू झाला, परंतु तो थोड्या घसरणीसह बंद झाला. आजच्या ट्रेडिंग सत्रात निफ्टी आणि सेन्सेक्समध्ये प्रचंड चढ-उतार पाहायला मिळाले. सेन्सेक्स त्याच्या मागील बंद पातळीपेक्षा 191.51 अंकांनी किंवा 0.24% खाली, 77,414.92 वर बंद झाला, तर निफ्टी 72.61 अंकांनी किंवा 0.31% खाली 23,519.35 वर बंद झाला.

शुक्रवारी टाटा कंझ्युमरने निफ्टी 50 इंडेक्स शेअर्समध्ये सर्वात मोठी उडी नोंदवली, जी 2.92% वाढीसह 1002 रुपयांवर बंद झाली, तर कोटक बँकेचे शेअर्स 2% वाढीसह 2171 रुपयांवर बंद झाले. यानंतर अपोलो हॉस्पिटलचे शेअर्स 1.92% च्या वाढीसह 6616 रुपयांवर बंद झाले, तर ONGC चे शेअर 1.74% च्या वाढीसह 246.38 रुपयांवर बंद झाले. याशिवाय टाटा मोटर्सचे शेअर्स 0.89% च्या वाढीसह 674.45 च्या पातळीवर बंद झाले.

**सेन्सेक्स 77,414**

**निफ्टी 23,519**

विप्रोचे समभाग 3.66% घसरून 262.25 वर बंद झाले, तर इंडसइंड बँकेचे समभाग 3.52% घसरून 649.85 वर बंद झाले. यानंतर, श्रीराम फायनान्सच्या समभागांनी 3.32% ची कमजोरी नोंदवली आणि 656 च्या स्तरावर बंद झाला, तर सिप्ला ने 2.75% ची घसरण नोंदवली आणि 1442 च्या पातळीवर बंद झाला. याशिवाय महिंद्रा अँड महिंद्राचे शेअर्स 2.46% नी घसरले आणि 2666 रुपयांवर बंद झाले.

आजच्या ट्रेडिंग सत्रात ग्राहक समभागांमध्ये चांगली खरेदी झाली, ज्यामुळे निफ्टी FMCG निर्देशांक 0.59% च्या वाढीसह 53,590 च्या पातळीवर बंद झाला. बँक निफ्टी 0.02% च्या किंचित घसरणीनंतर 51,565 च्या पातळीवर बंद झाला. निफ्टी फार्मा 0.65% घसरून 30,282 च्या पातळीवर बंद झाला. निफ्टी ऑटो 1.03% घसरून 21,296 च्या पातळीवर बंद झाला आणि निफ्टी आयटी निर्देशांक 1.76% घसरून 36,886 च्या पातळीवर बंद झाला.

# ममता बॅनर्जींच्या व्याख्यानात विद्यार्थ्यांची घोषणाबाजी

**लंडन, दि. २८ वृत्तसंस्था**

पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचे गुरुवारी ऑक्सफोर्ड विद्यापीठाच्या केलॉग कॉलेज येथे भाषण झाले. त्यांचे भाषण सुरू असताना काही विद्यार्थ्यांनी अचानक घोषणाबाजी करत गोंधळ घातला.

यावेळी ममतांनीही, दिदी (ममता) कुणालाही घाबरत नाही, मी रॉयल बेंगॉल टायगर आहे, अशा शब्दांत विद्यार्थ्यांना दम दिला. दरम्यान, यावेळी भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार आणि बीसीसीआयचे माजी अध्यक्ष सौरव गांगुली हे देखील प्रेक्षकांमध्ये उपस्थित होते.

ममता बॅनर्जी यांनी लंडन दौऱ्यात उद्योग आणि व्यापाराशी संबंधित महत्त्वाच्या बैठका घेतल्या. ऑक्सफर्डमधील केलॉग कॉलेज येथे ममतांना महिला, मुले आणि समाजातील दुर्बल गटांच्या सामाजिक विकासावर भाषण देण्यासाठी आमंत्रित केले होते.

आपल्या भाषणात त्यांनी 'स्वास्थ्य साथी' आणि 'कन्याश्री' यांसारख्या त्यांच्या सरकारच्या प्रमुख योजनांचा उल्लेख केला. ममता पश्चिम बंगालमधील औद्योगीकरणावर बोलत असताना, टाटा समूहाच्या टीसीएस कंपनीतील गुंतवणुकीचा विषय समोर आला.

त्याचवेळी, काही विद्यार्थ्यांनी 'निवडणूकीनंतरचा हिंसाचार' आणि 'आर. जी. कर कॉलेज'मधील बलात्कार प्रकरणांचे पोस्टर्स हातात धरून घोषणाबाजी



सुरू केली.

मात्र, मुख्यमंत्री बॅनर्जी म्हणाल्या की, "तुम्ही माझे स्वागत करत आहात, धन्यवाद! मी तुम्हाला मिठाई खाऊ घालीन. आर. जी. कर कॉलेज प्रकरण न्यायालयात प्रलंबित आहे. या प्रकरणाची चौकशी केंद्र सरकारकडे आहे. हा विषय आमच्या हातात नाही.

इथे राजकारण करू नका. हे त्यासाठी योग्य व्यासपीठ नाही. माझ्या राज्यात या आणि माझ्यासोबत राजकीय लढाई लढा."

आंदोलकांनी जाधवपूर विद्यापीठातील घटनेचा उल्लेख केल्यावर ममता म्हणाल्या की, भाऊ खोटं बोलू नका. मला तुमच्याबद्दल सहानुभूती आहे, पण या व्यासपीठाचा गैरवापर करू नका. जर तुम्हाला राजकारण करायचं असेल, तर बंगालला जा आणि तुमच्या पक्षाला मजबूत करा, मग आमच्याशी लढा."

आंदोलनकर्त्यांनी ओरडून बोलण्याचा प्रयत्न केल्यावर ममता म्हणाल्या की, 'माझा अपमान करून तुमच्या संस्थेचा अपमान करू नका. मी इथे भारताचे प्रतिनिधित्व करत आहे, तुमच्या देशाचा अपमान करू नका. तुम्ही मला पुन्हा-पुन्हा येथे येण्यासाठी प्रेरित केले आहे.

लक्षात ठेवा, 'दीदी' कोणालाही घाबरत नाही. 'दीदी' रॉयल बंगाल टायगरसारखी चालते. मला पकडायचं असेल, तर पकडा!'

दरम्यान, आयोजक आणि उपस्थितांमुळे आंदोलनकर्त्यांना सभागृह सोडावे लागले. आयोजकांनी या अनपेक्षित घटनेसाठी त्यांची माफी मागितली.

अचानक घडलेल्या या प्रकारामुळे उपस्थित श्रोते चकित झाले, मात्र मुख्यमंत्री बॅनर्जी यांच्या परखड आणि शांत प्रतिक्रियेस दाद देत त्यांनी टाळ्या वाजवल्या. आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांना आयोजक आणि उपस्थित पाहुण्यांच्या विरोधामुळे सभागृह सोडावे लागले. त्यानंतर मुख्यमंत्री बॅनर्जी यांनी भाषण विनाव्यत्यय पूर्ण केले.

# वृद्ध आई-वडिलांनी मुलांना घराबाहेर काढण्याची तरतूद कायद्यात नाही- सर्वोच्च न्यायालय

**नवी दिल्ली, दि. २८ वृत्तसंस्था**

वृद्ध नागरिक कायदा २००७ चा आधार घेऊन एका वृद्ध महिलेनं तिच्या मुलाला घराबाहेर काढण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. पण कायद्यामध्ये अशा प्रकारे मुलांना घराबाहेर काढण्याची तरतूद नसल्याचं नमूद करत न्यायालयाने ही याचिका फेटाळून लावली आहे. तसेच, यासंदर्भात अशी कारवाई करण्यासाठी अपवादात्मक परिस्थिती आधारभूत मानावी, असंही नमूद केलं आहे. गुरुवारी यासंदर्भात झालेल्या सुनावणीत न्यायालयाने हा निर्णय दिला.

न्यायमूर्ती पंकज मिथल व न्यायमूर्ती एस. व्ही. एन. भट्टी यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. या प्रकरणात याचिका करणाऱ्या वृद्ध दाम्पत्याला दोन्ही मुलांनी दर महिन्याला देखभाल खर्च देण्याचे निर्देश कुटुंब न्यायालयाने दिले होते. मात्र, त्यानंतर या दाम्पत्याने मुलांना घरातून बाहेर काढण्याची मागणी सादर केली. त्यांच्या मुलानं घराच्या एका भागात दुकान सुरू केलं होतं. तसेच, मुलगा वडिलांना वाईट वागणूक देतो, दैनंदिन जीवनात पालकांकडे लक्ष देत नाही असं कारण देत मुलांना घराबाहेर काढण्याची मागणी याचिकेत करण्यात आली.

दरम्यान, न्यायालयाने या वृद्ध दाम्पत्याची याचिका फेटाळून लावली आहे. “वृद्ध नागरिक कायदा २००७ मधली कोणतीही तरतूद वृद्ध माता-पित्यांच्या घरातून मुलांना बाहेर काढण्यासाठी लागू होत नाहीत. कायद्यातील तरतुदीनुसार न्यायालय फारतर वृद्ध आई-वडिलांना मुलांनी महिन्याचा देखभाल खर्च द्यावा असे आदेश देऊ शकतं. त्यात कुचराई केल्यास मुलावर अतिरिक्त आर्थिक दंड आकारता येतो. त्यानंतरही खर्च दिला नाही, तर मुलाला कमाल १ महिन्यापर्यंत तुरुंगवासाची शिक्षा देता येऊ शकते”, असं न्यायालयानं स्पष्ट केलं आहे.

अपवादात्मक स्थितीत मुलांना आई-वडिलांच्या घरातून बाहेर काढण्याचे आदेश दिले जाऊ शकतात, असं न्यायालयाने नमूद केलं. वृद्ध आई-वडिलांच्या सुरक्षेची खातरजमा करण्यासाठी मुलांना घराबाहेर काढणं आवश्यक ठरल्यास तसे आदेश देता येऊ शकतात, असंही न्यायालयाने यावेळी म्हटलं.

दरम्यान, या याचिकेच्या सुनावणीवेळी न्यायालयाने कौटुंबिक कलहामध्ये वाढ झाल्याबद्दल चिंता व्यक्त केली. “भारतात आपण ‘वसुधैव कुटुंबकम्’ या तत्वावर विश्वास ठेवतो. याचा अर्थ ही संपूर्ण पृथ्वी एक कुटुंब आहे. पण सध्याच्या काळात तर आपण आपल्या स्वत:च्या कुटुंबातही एकता राखू शकत नाही आहोत. मग हे विश्व एका कुटुंबाप्रमाणे मार्गक्रमण करणं तर लांब राहिलं. ‘कुटुंब’ ही संकल्पनाच अस्तंगत होऊ लागली आहे. आपण समाज म्हणून एक व्यक्ती एक कुटुंब या व्यवस्थेच्या उंबरठ्यावर उभे आहोत”, अशी महत्त्वपूर्ण टिप्पणी न्यायालयाने निकाल वाचनाच्या सुरुवातीलाच केली.

# स्वच्छ व सुरक्षित सिंहस्थ कुंभमेळा यशस्वितेसाठी सर्वांचा सहभाग आवश्यक - जलसंपदा मंत्री गिरीश महाजन

**नाशिक, दि. २८ प्रतिनिधी**

मागील कुंभमेळ्याच्या धर्तीवर २०२७ मध्ये होणारा सिंहस्थ कुंभमेळा हा स्वच्छ व सुरक्षित होण्याच्या दृष्टीने सर्वांचा सहभाग आवश्यक असून ही एक सामूहिक जबाबदारी आहे. ही जबाबदारी सर्वांच्या सहकार्यातून यशस्विपणे पार पाडू, असे प्रतिपादन राज्याचे जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण, पाटबंधारे विकास महामंडळ), आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी केले. आज जिल्हाधिकारी कार्यालयातील मध्यवर्ती सभागृहात आयोजित सिंहस्थ कुंभमेळा सन २०२७ बैठकीत ते बोलत होते.

यावेळी विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी जलज शर्मा, नाशिक महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री, उपजिल्हाधिकारी (कुंभमेळा) रवींद्र भारदे, जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता राजेश गोवर्धने, जलसंपदा विभागाच्या कार्यकारी अभियंता सोनल शहाणे, महंत





डॉ.भक्तीचरणदास महाराज, महंत रामनारायणदास महाराज, कपिलधारा कावनइ, महंत कृष्णचरदास महाराज, महंत राजारामदास महाराज, महंत भगवानदास महाराज, महंत नरसिंगाचार्य महाराज, महंत बालकदास महाराज, पुरोहित संघाचे अध्यक्ष सतीश शुक्ल यांच्यासह विविध आखाड्यांचे महंत उपस्थित होते.

जलसंपदा मंत्री महाजन म्हणाले की, आगामी कुंभमेळा सुरक्षित होण्यासाठी सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांची व सहकार्याची आवश्यकता आहे. प्रयागराज येथे झालेला कुंभमेळ्यातील भाविकांची संख्या लक्षात घेता नाशिक व त्र्यंबकेश्वर येथेही मागील कुंभमेळाच्या तुलनेत तीन ते चार पट अधिक गर्दी होण्याची शक्यता आहे. तसेच त्यावेळी पावसाळ्याचा कालावधी असल्यामुळे कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी सुरक्षितेचे अधिक काटेकोर नियोजन करावे लागणार आहे. कुंभ पर्वणी काळात महंत व भाविकांच्या स्नानासाठी नदीपात्रातील पाणी स्वच्छ व वाहते ठेवण्याच्या दृष्टीने पर्यायी पाणीसाठा उपलब्ध करण्यासाठी नियोजन सुरू असल्याचे मंत्री श्री. महाजन यांनी सांगितले.

सिंहस्थ कुंभमेळासाठी योग्य नियोजन व सुविधांसाठी आवश्यक जमिनी कायमस्वरूपी संपादित केल्या जातील. साधू-महंत यांना आवश्यक असणाऱ्या सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासन प्रयत्नशील असून यासाठी निधीची कमतरता भासणार नाही असेही जलसंपदा मंत्री श्री.महाजन यांनी सांगितले.

यावेळी महंत डॉ.भक्तीचरणदास महाराज, महंत रामकिशोरदास महाराज, रामसनेहीदास महाराज, राघवदास महाराज, सतीश शुक्ल यांच्यासह महंतांनी सिंहस्थ कुंभमेळा दृष्टीने विविध सूचना मांडल्या.

तत्पूर्वी जिल्हाधिकारी शर्मा यांनी बैठकीसाठी आलेल्या सर्व महंतांचे स्वागत केले.

# एटीएमचे व्यवहार महागणार

**येत्या १ मे पासून एटीएम मधून पैसे काढणे महागणार आहे. रिझर्व्ह बँकेने अधिसूचना जारी करून 'इंटरचेंज फी 'वाढविण्याची घोषणा केलेली आहे. जे ग्राहक आर्थिक व्यवहारांसाठी एटीएम वर अवलंबून आहेत,त्यांना मोफत व्यवहारांची मर्यादा पूर्ण झाल्यावर अतिरिक्त शुल्क भरावे लागणार आहे. याच अनुषंगाने अर्थतज्ज्ञ विश्वास उटगी यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.**

१]१ मे पासून एटीएम मधून पैसे काढणे महागणार आहे ते नेमके कसे?

रिझर्व्ह बँकेने नुकतीच जी अधिसूचना जारी केलेली आहे त्यानुसार १ मे पासून एटीएम मधून पैसे काढणे महागणार आहे. ग्राहकांची पैसे काढण्याची मोफत मर्यादा पूर्ण झाल्यानंतर प्रत्येक आर्थिक व्यवहारासाठी अतिरिक्त दोन रुपये मोजावे लागणार आहेत. या शुल्कवाढीमुळे आता एटीएम मधून पैसे काढताना प्रति व्यवहार १९ रुपये द्यावे लागणार आहेत. यापूर्वी हे शुल्क १७ रुपये होते. याशिवाय नॉन फायनांशियल ट्रान्सक्शन म्हणजेच बॅलन्स चौकशीसाठीचे शुल्क एक रुपयाने वाढणार आहे. याचा अर्थ आता खात्यातील शिल्लक तपासण्यासाठी आता प्रति व्यवहार ७ रुपये मोजावे लागणार आहेत.



**२] इंटरचेन्ज फी म्हणजे काय?**

एटीएम इंटरचेन्ज फी म्हणजे एका बँकेने दुसऱ्या बँकेच्या एटीएम सेवा वापरण्यासाठी दिलेले शुल्क आहे. जेंव्हा एखादा ग्राहक त्याच्या बँकेच्या एवजी दुसऱ्या बँकेच्या एटीएमचा वापर करतो किंवा पैसे काढतो, तेंव्हा संबंधित बँक त्या व्यवहारासाठी शुल्क आकारते. हे शुल्क ग्राहकांकडून थेट घेतले जात नसले तरी बँकेचा व्यवहाराचा एक भाग म्हणून बँक ते वसूल करते.

**साप्ताहिक संवाद**

**३]या नियमाचा लहान बँकांना फटका बसणार आहे का?**

शुल्क वाढीमुळे लहान बँकांचे ग्राहक प्रभावित होऊ शकतात. लहान बँक त्यांच्या पायाभूत सुविधा आणि संबंधित सेवांसाठी मोठ्या वित्तीय संस्थांवर अवलंबून असतात. त्यामुळे वाढत्या खर्चाचा फटका या लहान बँकांना बसू शकतो. लहान बँकांकडे स्वतःचे एटीएम कमी असतात अस्तित्वात असणारे एटीएम हे अनेकदा देखभालीसाठी किंवा दुरुस्तीसाठी बंद असतात. त्यामुळे लहान बँकांच्या ग्राहकांना मोठ्या बँकांच्या एटीएमवर अवलंबून राहावे लागते. एटीएम वाढल्यामुळे लहान बँकांच्या ग्राहकांवर हा अतिरिक्त बोजा पडणार आहे.

**लोकरंग**

# बिर्ला ओपस पेंट्सचा मुंबई आणि नवी मुंबईत पेंट स्टुडिओ

आदित्य बिर्ला ग्रुपच्या ग्रासिम उद्योगांतर्गत ग्रासिम इंडस्ट्रीजचा एक भाग असलेल्या बिर्ला ओपस पेंट्सने मुंबई आणि नवी मुंबई येथे नवीन बिर्ला ओपस पेंट स्टुडिओ (कंपनीच्या मालकीचे आणि कंपनीद्वारा संचालित स्टोअर) सुरू केल्याचे जाहीर केले. गुरुग्राम आणि लखनौ पाठोपाठ ब्रँडने केलेला हा विस्तार इनोव्हेशन, प्रीमियम ऑफरिंग्ज आणि एक खराखुरा गुंतवून ठेवणारा ग्राहक अनुभव यांच्या माध्यमातून पेंट आणि डेकोर उद्योगात परिवर्तन आणण्याच्या त्यांच्या वचनबद्धतेची ग्वाही देतो. सदर लॉन्च म्हणजे बिर्ला ओपस पेंटच्या विकास धोरणातील एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे आणि देशभरात आपली रिटेल उपस्थिती वाढविण्याचे त्याचे लक्ष्य आहे. अनुभवात्मक रिटेलवर फोकस ठेवून आगामी महिन्यांमध्ये बंगळूर, दिल्ली, हैदराबाद, कोलकाता, जयपूर, अहमदाबाद आणि सुरत येथे अतिरिक्त एक्सपिरीयन्स सेंटर्स उघडण्याची कंपनीची योजना आहे.

हे दोन नवे बिर्ला ओपस पेंट स्टुडिओ पारंपरिक पेंट दुकानांच्या पलीकडे जाऊन सर्जनशीलता आणि प्रेरणा यांचे केंद्र म्हणून डिझाईन करण्यात आले आहेत. ही अशी एक्सपिरीयन्स सेंटर्स असतील, जी ग्राहकांना नवनवीन कल्पनांचा शोध घेण्यास तसेच अगदी जिवंत वातावरणात रंगांचा स्पर्श, फील





**दखल**

आणि अनुभव घेण्यास मदत करतील. येथे शेडची निवड, टेक्श्चर्स आणि रंग लावण्याच्या टेकनिकच्या बाबतीत ग्राहकांना पर्सनलाईझ्ड गाईडकडून उत्तम मार्गदर्शन मिळू शकेल. येथील प्रगत व्हिज्युअलाईझेशन टूल्स घरमालकांना आपण निवडलेला रंग रियल-लाइफ सेटिंगमध्ये कसा दिसेल याचा प्रीव्ह्यू देतील. पेंट स्टुडिओमध्ये परिपूर्ण डेकोर सोल्यूशनसाठी पेंट व्यतिरिक्त वॉलपेपर्स, डिझाईनर फिनिश आणि स्पेशलिटी कोटिंगचे पर्याय देखील बघायला मिळतील.

# बीइंग ह्युमन फाऊंडेशन तर्फे नाशिक मालेगाव येथे हृदयरोग शिबीर

मानवतेप्रती असलेल्या वचनबद्धतेचा वसा पुढे सुरू ठेवण्याकरता, बॉलिवूड सुपरस्टार सलमान खानने ‘बीइंग ह्युमन फाऊंडेशन’च्या माध्यमातून अलीकडेच, नाशिकमधील मालेगाव येथे हृदयरोग विषयक शिबिराचे आयोजन केले होते. हे शिबीर २०० हून अधिक मुलांकरता जीवन संजीवनी ठरले. या शिबिरात त्यांच्या आरोग्यविषयक कोणत्याही संभाव्य समस्या ओळखण्याकरता मोफत हृदय तपासणी तसेच आणि इको चाचणी करण्यात आली.

‘बीइंग ह्युमन फाऊंडेशन’तर्फे गरजू व्यक्तींना आरोग्य सेवा उपलब्ध करून दिल्या जातात. याच मोहिमेचा एक भाग म्हणून हे हृदय विषयक शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात वंचित पार्श्वभूमी असलेल्या मुलांमधील हृदयाशी संबंधित आजार लवकर ओळखणे आणि त्या आजाराला प्रतिबंध करण्यावर लक्ष केंद्रित केले गेले. हृदयविकाराचा धोका अथवा समस्या समजून



घेण्याकरता इको चाचणी करण्यात आली, जेणे करून हृदयविकार आढळून आल्यास त्यावर त्वरित उपचार करता येईल.पडद्यावर ‘लार्जर दॅन लाइफ’ व्यक्तिरेखेकरता ओळखला जाणारा सलमान खान, त्याच्या फाऊंडेशनद्वारे मोठे सामाजिक काम गाजावाजा न करता करत आहे. एक मानवतावादी व्यक्ती या अर्थाने सलमान आपल्या प्रसिद्धीचा आणि संपत्तीचा वापर वंचितांच्या जीवनात आनंद फुलवण्याकरता करत आहे. प्रामुख्याने, आरोग्य सेवा, शिक्षण आणि बालकल्याण या क्षेत्रांत सलमानने अत्यंत प्रभावी काम केले आहे.

**नोंद**

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# शेतकऱ्यांना कर्जमाफीबाबत भविष्यातील परिस्थिती बघून आम्ही निर्णय घेऊ - अजितदादा

**बारामती, दि. २८ प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीत काही गोष्टी घडल्या होत्या. आर्थिक शिस्त गरजेची असते. त्याप्रमाणे अर्थसंकल्प सादर केला. विरोधकांनी टीका करायची ती केली. आम्ही वास्तववादी भूमिका घेऊन अर्थसंकल्प सादर केला. राज्याचा अर्थसंकल्प सादर करतो, मला थोडीशी तरी अक्कल आहे. सगळी सोंग करता येतात पैशाचे सोंग करता येत नाही, याचा पुनरुच्चार अजित पवार यांनी केला.



बारामतीमध्ये शेतकरी मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी अजित पवार यांनी अनेक मुद्द्यांवर आपल्या खास शैलीत थेट शब्दांत भाष्य केले. राज्यातील शेतकऱ्यांना राष्ट्रीयीकृत बँका, खासगी बँका, ग्रामीण बँका व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शाखांमार्फत शेती पीकासाठी कर्ज दिले जाते. यात सर्वाधिक कर्ज वितरण जिल्हा सहकारी बँकेमार्फत होते. सत्तेत आल्यास शेतकऱ्यांची कर्जमाफी करू, असे आश्वासन विधानसभा निवडणुकीपूर्वी महायुती सरकारने दिले होते. पुन्हा सत्तेत आलेले महायुती सरकार कर्जमाफी करेल का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. विरोधकांनीही शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा मुद्दा सातत्याने लावून धरला आहे. या मेळाव्यात बोलताना अजित पवार यांनी यावर भाष्य केले.

काहींनी निवडणुकीच्या आधी कर्जमाफी बाबत वक्तव्य केले होते. राज्यातील जनतेला सांगतो की, ३१ तारखेच्या आत कर्जमाफीचे पैसे भरा. जे आधी सांगितले होते, ते प्रत्यक्षात सध्या तरी येताना दिसत नाही. आता तशी परिस्थिती नाही, भविष्यातील परिस्थिती बघून आम्ही निर्णय घेऊ. आत्ता आपली परिस्थिती नाही, असे अजित पवार यांनी म्हटले आहे.

दरम्यान, बारामती तालुक्यातील माळेगांव सहकारी साखर कारखाना परिसरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे नूतनीकरण करण्यात आले. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते या नूतनीकरण करण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचा अनावरण सोहळा पार पडला.

# अय्यर, किशनला बीसीसीआयच्या केंद्रीय करारात स्थान

**मुंबई, दि. २८ प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) केंद्रीय करारातून वगळण्यात आल्यानंतर पुन्हा एकदा श्रेयस अय्यर आणि ईशान किशन यांना करारबद्ध करण्यात येईल, अशी माहिती मिळाली आहे. त्याचवेळी, मोहम्मद शमीला केंद्रीय करारातून वगळण्यात येण्याची शक्यता व्यक्त होत आहे. 'बीसीसीआय'च्या २०२४-२५ सत्राच्या केंद्रीय करारात अय्यर आणि किशन यांना स्थान मिळण्याची शक्यता आहे. अय्यरला 'ब' श्रेणीमध्ये स्थान मिळू शकते आणि यानुसार त्याला वर्षाला ३ कोटी रुपयांचे मानधन मिळू शकते. अय्यर आणि किशन यांना 'बीसीसीआय'च्या निर्देशानुसार देशांतर्गत स्पर्धांकडे दुर्लक्ष केल्यानंतर त्यांना २०२३-२४च्या केंद्रीय करारातून वगळण्यात आले होते.

# प्रदीप म्हापसेकर यांच्या 'मेरीगोल्ड' चित्र प्रदर्शनाची संपूर्ण मुंबईत चर्चा

**मुंबई दि. २८ प्रतिनिधी**

ख्यातनाम चित्रकार आणि व्यंगचित्रकार प्रदीप म्हापसेकर ह्यांच्या "मेरीगोल्ड" हे अमूर्त शैलीतील चित्र प्रदर्शन जहांगीर आर्ट गॅलरी च्या समोर आर्मी नेव्ही बिल्डिंग येथे भरले आहे. याचे उदघाटन लोकप्रिय अभिनेते मिलिंद गवळी यांच्या हस्ते पार पडले. त्यांची अमूर्त शैलीतील विविध संकल्पनांमधील चित्रमालिका पाहण्यासाठी या ठिकाणी अनेक दर्दी लोक गर्दी करत आहेत. मुंबईच्या कलावर्तुळात मेरीगोल्ड चित्र प्रदर्शनाची जबरदस्त चर्चा सुरू आहे. काळाघोडा येथील आर्मी नेव्ही इमारतीच्या तळमजल्यावर हे प्रदर्शन रविवारी ३१ तारखेपर्यंत सकाळी ११ ते संध्याकाळी ७ वाजेपर्यंत सर्वांसाठी खुले असणार आहे.

या प्रदर्शनाच्या उद्धाटन वेळी अभिनेते मिलिंद गवळी यांनी प्रदीप ह्यांचे याप्रसंगी कौतुक करताना त्यांच्या बहुतेक चित्रामध्ये दोन आकार असतात. जे प्रकृती किंवा जीवन घडविणाऱ्या स्त्रोताचे प्रतीक म्हणता येईल. त्यांच्यासारख्या कलाकाराने आता आंतरराष्ट्रीय स्तरावर झेप घ्यावी अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या.

उद्धाटनावेळी अष्टगंध प्रकाशन च्या संजय शिंदे यांनी प्रदीप हे चित्रकार, व्यंगचित्रकार आहेतच, शिवाय लेखक आणि कवी सुद्धा आहेत, त्यांच्या "चौथी सीट" ह्या पुस्तकाचे लवकरच प्रकाशन आपण करणार आहोत असे त्यांनी जाहीर केले.

प्रदीप हे दिव्यांग मुलांसाठी कार्यशाळा घेत असतात हे विशेष आहे. सदर प्रदर्शनातील चित्र विक्रीला आहेत आणि काही लिलावा साठी. ह्यातून मिळणारे पैसे हे "सेव्ह आर्ट" ह्या संस्थेला आणि काही सेवाभावी संस्थांना दिले जाणार आहेत.



**दैनिक महासागरचे मुख्य वृत्तसंपादक गजानन तुपे यांनी प्रदीप म्हापसेकर यांच्या मेरीगोल्ड या चित्र प्रदर्शनाला आज भेट दिली. प्रदर्शनातील चित्रमालिका, मेरी गोल्ड संकल्पना आणि अमूर्त शैली यावर त्यानिमित्ताने दोघांची चर्चा झाली. त्याप्रसंगी घेतलेले छायाचित्र**

# बीसीसीआयमध्ये नोकरीची संधी, फिरकी गोलंदाजी प्रशिक्षकासाठी अर्ज मागवले

**मुंबई, दि. २८ प्रतिनिधी**

बीसीसीआय फिरकी गोलंदाजी प्रशिक्षकाच्या शोधात आहे. यासाठी अर्ज मागविण्यात आले आहेत. हे प्रशिक्षक बेंगळुरूमधील बीसीसीआय सेंटर ऑफ एक्सलन्स येथे फिरकी गोलंदाजांना प्रशिक्षण देतील. बोर्डाने शुक्रवारी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही माहिती दिली आहे. या पदासाठी अर्ज सादर करण्याची शेवटची तारीख १० एप्रिल रोजी सायंकाळी ५वाजेपर्यंत आहे.

निवड झालेल्या या प्रशिक्षकांवर भारतीय पुरुष आणि महिला क्रिकेट संघ तसेच सर्व वयोगटातील संघांमधील फिरकी गोलंदाजीच्या प्रतिभेला प्रोत्साहन देण्याची जबाबदारी असेल. ते सेंटर ऑफ एक्सलन्स येथे इंडिया अ, अंडर-२३, अंडर-१९, अंडर-१६ आणि अंडर-१५ तसेच राज्य खेळाडूंना प्रशिक्षण देईल.

**जबाबदारी काय असेल?**

फिरकी गोलंदाजी प्रशिक्षक सेंटर ऑफ





एक्सलन्सच्या प्रमुखांसोबत मिळून कोचिंग प्रोग्रॅम आणि परफॉर्मेंस मॉनीटरिंगसाठी योजना तयार करतील. तसेच, निवड समिती, राष्ट्रीय आणि राज्य प्रशिक्षक, परफॉर्मन्स ॲनालिस्ट, स्ट्रेंथ आणि कंडिशनिंग तज्ञ यांच्यासोबत उच्च कार्यक्षमता प्रशिक्षण योजनांची निर्मिती करतील.

फिरकी गोलंदाजी प्रशिक्षकाच्या मुख्य जबाबदाऱ्यांमध्ये सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये क्रिकेट संघांसाठी प्रशिक्षण सत्रांची आखणी आणि अंमलबजावणी करणे, तसेच आवश्यकतेनुसार खेळाडूंना तांत्रिक प्रशिक्षण देणे यांचा समावेश असेल. प्रशिक्षकांना खेळाडूंच्या वैयक्तिक कामगिरीवर लक्ष द्यावे लागेल. तसेच, इतर विशेषज्ञ प्रशिक्षक, निवड समिती आणि सहाय्यक कर्मचारी यांच्या सहकार्याने फिरकी गोलंदाज शोधणे आणि त्यांच्या कौशल्यांचा विकास करणे या जबाबदाऱ्याही असतील. अर्जदार हा माजी भारतीय खेळाडू असणे आवश्यक आहे किंवा त्याने प्रथम श्रेणी स्तरावर किमान ७५ सामने खेळले आहेत. तसेच गेल्या ७ वर्षात किमान 3 वर्षांचा कोचिंग अनुभव असावा.

भारतीय संघाव्यतिरिक्त, अर्जदाराने इतर कोणत्याही आंतरराष्ट्रीय संघासोबत, भारत अंडर-१९, भारतीय महिला संघ, आयपीएल संघ किंवा कोणत्याही राज्य संघासोबत काम केलेले असावे.

महासागर NASHIK
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at S. R. publication, Mohan - Arjun Compund, Godown No. 8, 9 & 10, Near Ghartan Pada, Vaishali Nagar Last Bus Stop, Dahisar (E),Mumbai - 400068 and Published From 'ANANDI', KOTWAL PARK, TILAKWADI, APP. VED MANDEER, DHAMANKAR CORNER, NASHIK 422002 , Editor - SHRIKRISHNA TANSUKHDAS CHANDAK Executive Editor- Sanju Pawar, Resident Editor- Jayant Mahajan.

महासागर नाशिक
हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी एस. आर. प्रिंटर्स, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडावून नं. ८,९,१०, घरटन पाडा, वैशाली नगर, दहिसर ईस्ट, मुंबई येथे मुद्रीत करून 'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२ . येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - संजू पवार (मो. नं. ९८९०१०९९७८) निवासी संपादक - जयंत महाजन (९४२०६९१४२०) Email : mumbaimahasagar@gmail.com